रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ५६ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १ ऑगस्ट २०२४

किंमत ४ ₹

## अपघातात एक ठार, दोघे जखमी

पनवेल : पनवेलजवळील जुना पुणे-मुंबई महामार्गावर मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर ठोंबरेवाडी गावाजवळ बुधवारी सकाळी भरधाव मारुती सुझुकी सेलेरिओ गाडीवरील चालकाचा ताबा सुटल्याने भीषण अपघात झाला. यामध्ये गाडी रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडावर जाऊन आदळली. अपघातात गाडी चालकाचा गंभीररित्या जखमी होऊन मृत्यू झाला, तर गाडीतील दोघेजण जखमी झाले आहेत. गाडी चालक विजय पवार (४९, रा. कराड) हे त्यांच्या ताब्यातील मारुती सुझुकी सेलेरिओ (क्र. एमएच-४६-बीएफ-९५७८) घेऊन लोणावळा ते पान २ वर

## प्रीती सूदन यूपीएससीच्या अध्यक्ष

**नवी दिल्ली :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नव्या अध्यक्ष म्हणून प्रीती सूदन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रीती सूदन ह्या १९८३ च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. त्या मनोज सोनी यांची जागा घेणार आहेत. त्या १ ऑगस्टपासून कार्यभार सांभाळतील. केंद्रीय लोकसेवा आयोगाचे (यूपीएससी) अध्यक्ष मनोज सोनी यांनी नुकताच त्यांचा कार्यकाळ संपण्याअगोदर राजीनामा दिला होता. त्यांचा कार्यकाळ २०२९ पर्यंत होता; परंतु पाच वर्षे अगोदर त्यांनी राजीनामा दिला. त्यामुळे रिक्त झालेल्या जागी आता प्रीती सूदन यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# आरोग्य केंद्रच असुरक्षित

## नियोजनातील निधी खर्च करण्यास बांधकाम विभाग उदासीन




प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**ग्रामीण आरोग्य सेवा मजबूत करण्याच्या बाता जिल्हा परिषद आरोग्य विभाग कायमच करीत आले आहे. मात्र, जिल्ह्यातील आरोग्य व उपकेंद्रांची दुरुस्ती करण्यास ही यंत्रणा अपयशी ठरल्याने केंद्रामध्ये उपचारासाठी येणारे रुग्ण, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नियोजनातून १३३ कामांसाठी १४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. फक्त ६ केंद्रांची दुरुस्ती करण्यास या यंत्रणेला यश आले आहे. उर्वरित १२७ केंद्र दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत.**



रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजार असून, जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक गावे, वाड्या आहेत. ग्रामीण भागाची आरोग्य सेवा मजबूत करण्यासाठी तसेच गावे, वाड्यांमध्ये राहणाऱ्या रुग्णांना चांगली आरोग्य सेवा मिळावी यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या अखत्यारित ५५ आरोग्य केंद्र, २८० आरोग्य उपकेंद्र, सात जिल्हा परिषद दवाखाने आहेत. या संस्थांच्या माध्यमातून रुग्णांना सेवा देण्याचे काम केले जाते.

### केंद्राची तात्काळ दुरुस्ती करा

#### चित्रलेखा पाटील यांची मागणी

रामराज येथील आरोग्य उपकेंद्राचा स्लॅब कोसळून एक आरोग्य सेविका जखमी झाली. त्यामुळे आरोग्य विभागात कर्मचारी सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. उपकेंद्राच्या दुरुस्तीसाठी गेल्यावर्षी सात लाख रुपयांचा निधी देण्यात आला. मात्र, त्याची दुरुस्ती करण्यास जिल्हा परिषद बांधकाम विभाग उदासीन ठरला आहे. आरोग्य केंद्राची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केली आहे.


> “नियोजनातून आरोग्य केंद्र, उपकेंद्र दुरुस्तीसाठी निधी मिळाला. जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. १३३ कामांपैकी फक्त ६ केंद्रांची दुरुस्ती करण्यात आली आहे. उर्वरित केंद्राचे काम करणे शिल्लक राहिले आहे.”
>
> – डॉ. मनिषा विखे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद

जिल्हा परिषद दवाखान्यांसह आरोग्य केंद्र व उपकेंद्रांमध्ये वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. नादुरुस्त असलेली केंद्र दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधीची मागणी करण्यात आली होती. पान २ वर

# ‘झिका’ स्वच्छतेपुढे फिका

- **जिल्ह्यात मलेरियाचे २४९, डेंग्युचे १९० रुग्ण झाले बरे**
- **डेंग्युसदृश्य सहा रुग्णांच्या मृत्यूचे होणार ऑडिट**

। खास प्रतिनिधी ।
। रायगड ।



राज्याच्या काही भागामध्ये विशेषतः पुणे जिल्ह्यात झिका व्हायरसने डोके वर काढले आहे. रायगड जिल्ह्यात अद्यापही झिका व्हायरसचा एकही रुग्ण आढळलेला नसला, तरी नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. जानेवारीपासून आतापर्यंत जिल्ह्यात डेंग्युचे १९०, तर मलेरियाचे २४९ रुग्ण आढळले होते. सर्व रुग्ण बरे झाले असून, पैकी डेंग्युसदृश्य सहा रुग्णांचा मृत्यू झाला आहे. झिका व्हायरसचा प्रसार एडीस डास चावल्याने होतो. त्यामुळे नागरिकांनी डासापासून आपले संरक्षण करणे गरजेचे आहे, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजाराम भोसले यांनी ‘कृषीवल’शी बोलताना सांगितले.

जानेवारी ते जून २०२४ या कालावधीत डेंग्युचे १९० रुग्ण आढळे आहेत. त्यामध्ये पनवेल महापालिका क्षेत्रातील रुग्णांचा सर्वाधिक समावेश आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बांधकामासंबंधित विकासकामे सुरु आहेत. आतापर्यंत सहा डेंग्युसदृश्य रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अन्य रुग्ण बरे झाले आहेत. उपसंचालक पान २ वर

### कशामुळे होतो?

**एडीस डास चावल्यामुळे झिका व्हायरसचा प्रसार होतो. एडीस डास हा सकाळी आणि सायंकाळी चावल्याने प्रसारास मदत होते. याच डासांमुळे डेंग्यू, चिकनगुनिया यासारखे आजार पसरतात. त्याचप्रमाणे लैंगिक संबंधातूनही झिका व्हायरसचा प्रसार होतो.**

### झिका व्हायरसची लक्षणे?

**झिकाची लागण झाल्यास मृत्यूचे प्रमाण कमी असते. दर पाच संसर्गजन्य लोकांमध्ये एका व्यक्तीत झिकाची लक्षणे आढळतात. हलकासा ताप, डोळे लाल होणे आणि सुजणे, डोकेदुखी, गुडघेदुखी, शरीरावर लाल चट्टे येणे, अशी लक्षणे दिसून येतात.**

> “परिसर स्वच्छ ठेवणे, पाणीसाठा होऊ देऊ नये, डासांचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करणे, डास चावू नये म्हणून जास्तीत जास्त अंग झाकले जातील असे कपडे घालणे. झोपण्यासाठी मच्छरदानीचा वापर करणे, डासांचा प्रसार रोखणाऱ्या औषधांचा वापर करणे. झिका व्हायरस हा एडीस डास चावल्यामुळे होतो. जिल्ह्यात याचा अद्यापही रुग्ण आढळलेला नाही. मृत्यू ओढवण्याचे प्रमाण कमी आहे. परंतु, नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे.”
>
> – डॉ. राजाराम भोसले, जिल्हा हिवताप अधिकारी, रायगड

**आजचा अग्रलेख**
**जात काढणाऱ्यांची जात**

**वे|ध|क**

## आरोपीला सात दिवसांची कोठडी

**उरण :** यशश्री शिंदेची हत्या करणारा आरोपी दाऊद शेख याला नवी मुंबई क्राईम ब्रांचने बुधवारी (दि. ३१) पहाटे चार वाजता उरण पोलिसांच्या ताब्यात दिले. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त (पोर्ट विभाग) नवी मुंबई डॉ. विशाल मेहुल, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते उपस्थित होते. पोलिसांनी सकाळी सहा वाजता आरोपीला पनवेल सत्र न्यायालयात हजर केले असता, नायालयाने आरोपीला सात दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली. दाऊदने गुन्हा कबूल केला. यशश्रीने लग्नाला नकार दिला म्हणून तिची हत्या केल्याचे त्याने सांगितले आहे.

## राज्यपालांनी घेतली शपथ

**मुंबई :** सी.पी. राधाकृष्णन राज्याचे नवे राज्यपाल बनले आहेत. नवनियुक्त राज्यापालांनी राज्यपाल पदाची शपथ घेतली. मुंबई उच्च न्यायालयचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी त्यांना शपथ दिली. सी.पी. राधाकृष्णन आधी झारखंडचे राज्यपाल होते. त्यांच्या जागी आता संतोषकुमार गंगवार हे झारखंडचे राज्यपाल असतील. दरम्यान, रमेश बैस (१८ फेब्रुवारी २०२३ ते २८ जुलै २०२४) आणि भगतसिंग कोश्यारी (२०१९-२०२३) यांच्यानंतर राधाकृष्णन हे गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्राचे तिसरे राज्यपाल बनले. या नियुक्तीसह राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे २४ वे राज्यपाल बनले आहेत.

# आता एक तर तू राहशील किंवा मी

## उद्धव ठाकरेंचा फडणवीसांना इशारा

। मुंबई । प्रतिनिधी ।

आदित्यला तुरुंगात टाकण्यासाठी देवेंद्र फडणवीस कशाप्रकारे डाव खेळत होते, हे मला अनिल देशमुख यांनी सांगितले. आता एक तर तू राहशील नाहीतर मी राहील, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात दंड थोपटले आहेत. ते बुधवारी मुंबईतील रंगशारदा सभागृहात झालेल्या ठाकरे गटाच्या मेळाव्यात बोलत होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध थेट ‘आर या पारची’ भूमिका घेतल्याने आगामी काळात ठाकरे गट आणि भाजपमधील



संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

गेल्या काही दिवसांमध्ये अनेक मोठे नेते आपल्याला भेटून गेले आहेत. अनेकजण म्हणाले की, उद्धवजी आपने देश को दिशा दिखाई है. मी म्हणालो, जोपर्यंत आपण सरळ होतो, तोपर्यंत सरळ असतो. पान २ वर

# अखेर ३५ व्या स्मरणपत्राने न्याय

## रायगड जिल्हा परिषदेने पाणीपुरवठा केला सुरळीत

आविष्कार देसाई
। रायगड ।

अलिबाग तालुक्यातील धेरंड-शहापूर परिसरातील नागरिकांना पाण्याच्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागत आहे. चार वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीने पाण्याची पाईपलाईनच काढून नेल्याने येथील पाच कुटुंबांना पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. याविरोधात येथील ग्रामस्थ राजन भगत यांनी प्रशासनाला एक हजार स्मरणपत्र पाठवण्याचा संकल्प केला होता. पाणी देत नाही तोपर्यंत स्मरणपत्र आंदोलन सुरुच ठेवणार असल्याचे मनसुबे त्यांनी स्पष्ट केले होते. भगत यांच्या ३५ व्या स्मरणपत्राची दखल घेत रायगड जिल्हा परिषद प्रशासनाने



रविवारी जिल्हा परिषद प्रशासनाने राजन यांच्या परिसरात पाईपलाईन जोडून पाणी सुरु केले आहे. त्यामुळे पाच कुटुंबांचा प्रश्न आता निकाली निघाला आहे. गावात पाणी देण्यासाठी जलजीवन मिशनचे काम तातडीने पूर्ण गरजेचे आहे, असे राजन भगत यांनी कृषीवलशी बोलताना सांगितले.

आता पाण्याची पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा सुरळीत सुरु केला आहे.

प्रशासकीय यंत्रणेबरोबर गेले तीन वर्षे एकाकी पान २ वर

# वायनाड भूस्खलनात आतापर्यंत १४५ बळी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

केरळमधील वायनाड जिल्ह्यात झालेल्या भूस्खलनात मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या १४५ च्या पुढे पोहोचली असून, अद्याप ९० हून अधिक लोक बेपत्ता असल्याचं सांगितलं जात आहे.

एनडीआरएफ, नौदल आणि वायूदलाच्यावतीनं बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. पावसामुळे मातीचा चिखल झाला आहे, त्यामुळे बचावकार्यात अडथळे येत आहेत. आतापर्यंत १२८ जण जखमी झाल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, खराब हवामानामुळे बचाव पथकाला मोठी अडचण येत आहे. या दुर्घटनेनंतर केरळ सरकारनं दोन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.



घटनास्थळी मृतांच्या नातेवाईकांना गर्दी केली आहे. नातेवाईक आपल्या जीवलगांचा शोध घेत आहेत. अजूनही बरेच लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. नागरी संरक्षण, पोलीस, अग्निशमन विभाग, एसडीआरएफ, एनडीआरएफचे सुमारे २५० कर्मचारी मदत आणि बचाव कार्यात गुंतले आहेत. लष्करादेखील पाचारण करण्यात आले आहे.

# शेकापचे पंढरपूर येथे अधिवेशन

। पंढरपूर । प्रतिनिधी ।

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे १९ वे अधिवेशन शुक्रवारी (दि. २) व शनिवारी (दि. ३) पंढरपूर येथील विठ्ठल रखुमाई पॅलेस येथे भाई डॉ. गणपतराव देशमुख नगरीत संपन्न होणार असल्याची माहिती अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिली. या अधिवेशनास शरद पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, उद्घाटन मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे सरचिटणीस कॉम्रेड दीपाशंकर भट्टाचार्य यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील मार्गदर्शन करणार आहेत. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी संपतराव पवार-पाटील असणार आहेत.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शुक्रवार (दि. २) रोजी खुले सत्र होणार असून, दुपारी दोन वाजता प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रांती ज्योती मशालीचे प्रज्वलन करण्यात येणार आहे. अधिवेशनाचे अध्यक्ष संपत पवार-पाटील यांच्या हस्ते लाल ध्वजाला सलामी देण्यात येईल. स्वागताध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख आपले विचार व्यक्त करणार आहेत. पान २ वर

### शरद पवार राहणार उपस्थित

### रायगडातून हजारो कार्यकर्ते जाणार

**अलिबाग : रायगड जिल्ह्यातील पाच हजारांहून अधिक कार्यकर्ते या अधिवेशनात सहभागी होणार आहे. अधिवेशनाला जाण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या अधिवेशनाला शेकापचे नेते माजी आ. जयंत पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अधिवेशनात सहभागी होण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. अधिवेशनामध्ये पक्षश्रेष्ठींकडून मोलाचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना मिळणार आहे. जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी या अधिवेशनात सहभागी व्हावे, असे आवाहन शेकापच्या वतीने करण्यात आले आहे.**

# अखेर उमेदवारी तात्पुरती रद्द

**यूपीएससीचा मोठा निर्णय**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या पूजा खेडकर यांची उमेदवारी यूपीएससीने अखेर तात्पुरती रद्द केली आहे. आधी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील गैरवर्तन व त्यानंतर कागदपत्रांमध्ये आढळलेली कथित अनियमितता या पार्श्वभूमीवर उमेदवारी रद्द केल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, यापुढे यूपीएससीकडून घेण्यात येणाऱ्या



कोणत्याही परीक्षेमध्ये पूजा खेडकर यांना बसता येणार नाही, असंही यूपीएससीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. पूजा खेडकर यांच्यासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. एकीकडे यूपाएससीनं त्यांच्यावर ही कारवाई केलेली असताना, दुसरीकडे पूजा खेडकर यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर अद्याप पतियाला कोर्टानं निर्णय दिलेला नाही.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात गैरवर्तन केल्याचा ठपका पूजा खेडकर यांच्यावर आधी ठेवण्यात आला. त्यानंतर हे प्रकरण चर्चेत आलं. पुढे पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना त्यांच्या दिव्यंगत्वाबाबत चुकीची पान २ वर




## कोकणासाठी ४३०० जादा एसटी बस धावणार

# गणेशभक्तांची चिंता मिटली!

। मुंबई । प्रतिनिधी ।

कोकणी माणसाला आता वेध लागले आहेत ते गणेशोत्सवाचे. गणपतीसाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी गणेशोत्सव काळात जादा बसेस सोडण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला आहे. त्यानुसार एसटीच्या जादा ४३०० बसेस धावणार आहे. काही दिवसांपूर्वी रेल्वेने विशेष गाड्या जाहीर केल्या होत्या. परंतु, काही क्षणात त्यांचे बुकिंग फुल्ल झाले होते. दरम्यान, एसटीच्या जादा बस सोडण्यात येणार असल्याने कोकणवासियांची चिंता मिटली आहे.

७ सप्टेंबर २०२४ रोजी गणरायाचे आगमन होत असून, बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ सज्ज झाले आहे. मुंबईतील कोकणाच्या चाकरमान्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा जादा बसेस सोडण्याच्या निर्णय घेतला आहे. दि. २ ते १७ सप्टेंबरदरम्यान ४३०० जादा बसेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, ज्येष्ठ आणि महिलांना ५० टक्के तिकीट दरात सवलत दिली जात आहे. २ सप्टेंबरपासून मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बसस्थानकातून जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

### असे करा बुकिंग

बसेस आरक्षणासाठी npublic.msrtcors.com हे अधिकृत संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले असून, सदर बसेसचे आरक्षण बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या MSRTC Bus Reservation ॲपद्वारे उपलब्ध होणार आहे. जास्तीत जास्त प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा.



### प्रवाशांना सुखकर प्रवासाची हमी

गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथकदेखील तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रवाशांना नैसर्गिक विधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधानगृह उभारण्यात येणार आहेत.

# दाऊदला भरचौकात फाशी द्या : म्हात्रे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तीन दिवसांपूर्वी नवी मुंबईत उरणमध्ये यशश्री शिंदे नावाच्या वीस वर्षीय तरुणीची अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. या प्रकरणातील आरोपी दाऊद शेख हा यशश्रीची हत्या करून कर्नाटकमध्ये पळून गेला होता. अखेर नवी मुंबई पोलिसांनी कर्नाटकमध्ये जाऊन आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. यशश्री शिंदे च्या कुटुंबियांची बुधवारी (दि. ३१) शेतकरी कामगार पक्षाचे नेते प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी भेट घेतली. त्यांचे सांत्वन करतानाच आरोपीला भरचौकात फाशी दिली गेली पाहिजे जेणेकरून भविष्यात अशा प्रकारचे कृत्य करण्यासाठी कोणी धजावणार नाही, अशा प्रकारची तीव्र शब्दात भावना त्यांनी व्यक्त केली.



रविवारी उरणमधील नागरिकांच्या वतीने काढण्यात आलेल्या निषेध मोर्चातही ते सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी सांगितले अशा प्रकारचे घटना घडण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आजची तरुण पिढी नशेच्या अधीन झाली आहे. उरण-पनवेल परिसरात सर्रासपणे गांजा आणि इतर नशेडी पदार्थ तरुणांना सहज उपलब्ध होत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. यावर लवकरच उपाययोजना सरकारने करणे अपेक्षित आहे. तर त्यांनी अशा प्रकारच्या अनेक घटना आपल्या परिसरात आत्ताही घडत असतील, मी अशा सर्व तरुणी आणि त्यांच्या पालकांना आवाहन करू इच्छितो की कुठल्याही दडपणाखाली न राहता पोलिसांशी संपर्क साधून आपल्या समस्या व्यक्त कराव्या. जेणेकरून अजून नवीन दाऊद शेख तयार होण्याच्या अगोदरच ठेचला जाईल. अशा अडचणीच्या वेळी पोलीस प्रशासनासोबतच आम्ही सर्व तुमच्यासोबत आहोत. आमच्याशी कधीही संपर्क साधा. या गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी कार्यतत्परता दाखवून आरोपीच्या मुस्क्या आवळल्या त्याबद्दल त्यांचेही आभार. मला न्याय व्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे, त्याला फाशीच मिळेल, ही आमची मुख्य मागणी पूर्ण होईल.

## अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांच्या मुसक्या आवळा

> **नशेच्या अधीन होऊन तरुण पिढी बिघडत आहे. मानखुर्द गोवंडी येथून हे अंमली पदार्थ विक्रेते रेल्वेने येतात आजूबाजूच्या परिसरातील ठराविक चहा-पान टपऱ्या, इस्त्रीवाले, ठराविक नाके या ठिकाणी चरस गांजा तरुणांना उपलब्ध करून देतात. प्रथमतः हे अड्डे उद्ध्वस्त केले पाहिजे. आम्ही स्वतः नवीन पनवेल, अमेटी कॉलेज, खारघर, उलवे नोडपासून सुरुवात केली आहे. नागरिकांना मी आवाहन करीन, आपल्या नजरेस असे काही आढळल्यास थेट आमच्याशी संपर्क साधा. आपण कायद्याच्या चौकटीत ते उद्ध्वस्त करण्याचा पूर्ण बंदोबस्त करू जेणेकरून आपली तरूण पिढी भविष्यात व्यसनाधीन होणार नाही.**
>
> **- प्रीतम म्हात्रे, शेकाप नेते**

## यशश्रीच्या हत्याराला फाशीची शिक्षा द्या

**। तळा । वार्ताहर ।**

उरण येथे झालेल्या यशश्री शिंदे हत्या प्रकरणातील आरोपीला फाशीची शिक्षा द्या, या मागणीचे निवेदन सकल हिंदू समाज तळातर्फे तहसीलदार स्वाती पाटील यांना देण्यात आले. उरण तालुक्यातील सातराठी येथे राहणाऱ्या यशश्री शिंदे हिची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. मानवजातीला काळीमा फासणारी ही घटना असून, या प्रकरणाचा संपूर्ण जिल्हाभरातून निषेध नोंदविण्यात येत आहे.

त्या पार्श्वभूमीवर तळा तालुका सकल हिंदू समाजातर्फे या घटनेचा निषेध नोंदविण्यात आला असून, यातील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी या मागणीचे निवेदन तहसीलदार स्वाती पाटील यांना देण्यात आले आहे. याप्रसंगी तळा तालुक्यातील हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## आरोग्य केंद्रच असुरक्षित

नियोजनातून १३३ कामांसाठी १४ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. मात्र, यातील पाच टक्के निधीदेखील दुरुस्तीसाठी खर्च करण्यात आला नसल्याचे आकडेवारीनुसार दिसून येत आहे. केंद्राची दुरुस्ती करण्याची जबाबदारी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे सोपविण्यात आली. १३३ कामांपैकी फक्त ६ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित १२७ कामे अद्याप प्रलंबित आहेत.

पावसाळ्यात रामराज येथील उपकेंद्राचा स्लॅब कोसळून आरोग्य सेविका जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली. कर्मचारी व रुग्ण जखमी झाल्यावरच केंद्राची दुरुस्ती करणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## 'झिका' स्वच्छतेपुढे फिका

यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते. डेंग्युसदृश्य रुग्णांच्या मृत्यूचे ऑडिट केले जाते. त्यानंतरच संबंधित रुग्णाचा डेंग्युने मृत्यू झाल्याचे स्पष्ट होते. जानेवारी ते जून २०२४ या कालावधीत २४९ मलेरियाचे रुग्ण आढळले असून, सर्व रुग्ण योग्य औषधोपचाराने बरे झाले आहेत.

## अखेर ३५ व्या स्मरणपत्राने न्याय

झुंज देणारे राजन भगत एका अनोख्या आंदोलनामुळे पुन्हा चर्चेत आले होते. पाणी पिळावे यासाठी सरकारसह रायगड जिल्हा परिषद प्रशासनाला एक हजार स्मरणपत्रे पाठवणार होते. त्यांनी आतापर्यंत इमेलद्वारे ३५ स्मरणपत्रे सरकार आणि प्रशासनाला पाठवली असून, त्यांची दखल आता जिल्हा परिषदेने घेतली आहे.

अलिबाग तालुक्यातील शहापूर-धेरंड हे गाव २००६ साली रिलायन्स आणि टाटाच्या औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पामुळे प्रकाशझोतात आले होते. पुढे परिसरातील नागरिकांनी कायदेशीर विरोध करत दोन्ही कंपन्यांना बाहेरचा रस्ता दाखवला होता. त्याच शहापूर-धेरंड परिसरात पाण्याची समस्या निर्माण झाली. येथील लोकसंख्या सुमारे पाच हजार आहे. गावात पाण्याची समस्या कायम आहे. त्यामुळे पिण्याचे पाणी मिळावे यासाठी ग्रामस्थांनी वेळोवेळी आंदोलने केली आहेत. राजन भगत यांनी तर प्रशासकीय यंत्रणेसोबत ढीगभर पत्रव्यवहार, अर्ज, विनंत्या केल्या आहेत. पाणी मिळणार एवढेच आश्वासन त्यांना मिळत आले होते. आश्वासनाचे चौथे वर्ष असताना त्यांना अखेर न्या मिळाला आहे.

## पूजा खेडकरची उमेदवारी तात्पुरती रद्द

कागदपत्रे सादर केल्याचाही आरोप करण्यात आला. शिवाय, त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी ओबीसी क्रिमी लेअर सुविधेचा लाभ घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, यासाठी त्यांनी परीक्षेसाठी अर्ज करताना नावामध्येही वारंवार बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी याचबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून त्याचा उल्लेख न्यायालयातील सुनावणीमध्ये करण्यात आला.

पूजा खेडकर यांनी सनदी सेवेत निवड होताना चुकीची कागदपत्रे सादर केली होती, असा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्यात त्यांच्या वडिलांची कोट्यवधींची मालमत्ता असूनही त्यांनी क्रीमिलेअर प्रमाणपत्राचा फायदा घेऊन आयएएस पद पदरात पाडून घेतल्याचाही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याशिवाय, त्यांनी सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्रामध्येही अनियमितता असल्याचा दावा न्यायालयातील सुनावणीदरम्यान करण्यात आला आहे.

## शेकापचे पंढरपूर येथे अधिवेशन

तसेच दुपारी तीन वाजता पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील हे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करुन देतील. दीपाशंकर भट्टाचार्य उद्घाटनीय विचार व्यक्त करतील. तसेच दुपारी सव्वाचार वाजता शरद पवार मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी उदय नारकर, ॲड. सुभाष लांडे, भीमराव बनसोड, किशोर ढमाले, साथी प्रताप होगाडे आपले विचार व्यक्त करतील. सायंकाळी साडेपाच वाजता शेतकरी कामगार पक्षाचे प्रा. एस.व्ही. जाधव हे राजकीय ठराव मांडणार आहेत.

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे शनिवार (दि. ३) रोजी सकाळी नऊ वाजता थोर विचारवंत माननीय कराळे यांचे 'संविधान' या विषयावरती व्याख्यान होणार आहे. तसेच सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत राजकीय ठरावावरती चर्चा होईल. दुपारी अध्यक्षीय मंडळाच्या सहमतीने पक्षाचे पदाधिकारी, सरचिटणीस व चिटणीस मंडळ, मध्यवर्ती समिती अशा विविध पदाधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण निवडी करण्यात येणार आहेत. शेवटी पक्षाचे नवनिर्वाचित सरचिटणीस अधिवेशनाच्या समारोपाचे भाषण करतील व अधिवेशनाची सांगता होईल.

या अधिवेशनात पक्षाचे व पुरोगामी युवक संघटनेचे राज्यभरातून जे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते येणार आहेत, त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तरी, या अधिवेशनास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केले आहे.

## एक तर तू राहशील, नाहीतर मी

पण एकदा वाकड्यात घुसलो की आपण वाकडं करतो. भाजप म्हणजे चोर कंपनी आहे, ही राजकारणातील षंढ माणसं आहेत, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला. लोकसभा निवडणुकीत आपण असे लढलो की, मोदींनाही घाम फुटला. मोदींची भाषण ऐकताना आता कीव येते. मी कधी नगरसेवक झालो नव्हतो, थेट मुख्यमंत्री झालो. जे जे शक्य होतं, ते सगळं मी केले. हे आपल्यासाठी शेवटचं आव्हान आहे. त्यानंतर आपल्याला आव्हान देणार कोणी राहणार नाही. यांनी आपला पक्ष आणि कुटुंब फोडले. आता हे आपल्याला आव्हान द्यायला उभे आहेत. शिवसेना ही गंजलेली तलवार नाही, तर तळपती तलवार आहे. मुंबई टिकवण्यासाठी आपल्याला लढा द्यायचा होता. आपल्या हक्काच्या मुंबईत आपल्याला असे वागवले जात आहे. हे सगळं दोन व्यापारी करत आहेत. त्यांची वृत्ती आपल्याला मुळासकट उपटून टाकायची आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

## अपघातात १ ठार, २ जखमी

पनवेल असा प्रवास करीत होते. दरम्यान, शेडुंग टोलनाका ठोंबरेवाडी येथे त्यांच्या गाडीवरील त्यांचा ताबा सुटून रस्त्यावर असलेल्या झाडावर जाऊन गाडी आदळली. या अपघातात ते स्वतः गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले आहेत. तर गाडीतील प्रवासी भिकाजी गायकवाड (५८) व संगीता गायकवाड (५४) हे जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मूक मोर्चादरम्यान रोहेकरांचा संताप अनावर

**। चणेरा । प्रतिनिधी ।**

उरण येथील यशश्री शिंदे हिच्या हत्याकांडाने संबंध राज्य चांगले हादरले. शिंदे हिची अत्यंत क्रूर हत्या करण्यात आली. घटनेची निंदा करावी तेवढे कमीच आहे. क्रूरकर्मा आरोपी दाऊद शेखला अटक करण्यात आली. संबंधित आरोपीला भरचौकात फाशी द्या, असा आक्रोश चोहोबाजूने होत आहे. याच घटनेआधी ठाणेतील अक्षता म्हात्रे हिच्यावर चक्क मंदिरातील पुजाऱ्यांनी अतिप्रसंग करून हत्या केली. याही घटनेचा सर्वत्र निषेध होत असतानाच मंगळवारी रोहा शहरात निघालेल्या यशश्री शिंदे हिच्या हत्याच्या निषेधार्थ मूक मोर्चात मोठ्या संख्येने रोहेकर एकटवले. मोर्चात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.



नराधमांना फाशी द्या असा संताप मोर्चेकरांनी व्यक्त केला. राम मारुती चौकातून निघालेल्या मूक मोर्च्याची सांगता तीन बत्ती नाका पोलीस चौकात झाली. यावेळी तहसीलदार किशोर देशमुख यांना मोर्चेकरांनी निवेदन देऊन सरकाराकडे फाशीच्या शिक्षेची मागणी केली. दरम्यान, नागोठणे, कोलाड यांसह सर्वत्र निघालेल्या मोर्च्यात भगिनी अक्षता म्हात्रे, यशश्री शिंदे यांच्या हत्येचा एकत्रित निषेध केला. जात-धर्म न पाहता नराधमांना फाशी द्या, अशी मागणी करण्यात येत आहे. या निषेध मोर्चाला सबंध रोहेकरांनी मोठी गर्दी केल्याने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

Email :- mahad.ee@mahapwd.gov.in ph. No.(02145)222167

**निविदा सूचना क्रमांक १६ सन २०२४-२०२५ (द्वितीय सूचना)**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन- ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in. या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी पावसाळा (धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १०६१३३७ | राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत मौजे दासगाव ता. महाड येथील तलावाचे संवर्धन करणे. ता. महाड, जि. रायगड (द्वितीय सूचना) | २८९१६२७७.०० | १५००००.०० | २३६०/- | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३१-०७-२०२४ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक ०७-०८-२०२४ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग कोंकण, मर्झबान रोड फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०१-०८-२०२४ वेळ १२.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोंकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक ०९-०८-२०२४ वेळ १२.०० वाजता |

टिप :- परिपूर्ण निविदा https://mahatenders.gov.in. या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळावरच पाहता येतील.

जा.क्र.मवि/लेशा/निविदा/३४५६

दिनांक : २९-०७-२०२४

**सही/-**

**कार्यकारी अभियंता**

**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दयानंद देवीदास पाटील व श्री. समीर बाळू राणे यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ७१ | ३८ | ४.५७.९९ | ४६.०० |

तरी सदर बिनशेती मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, बोजा, हक्क, हितसंबंध, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारसाहक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत दयावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पत्ता :१०३, पांडुरंग धाम, नेरळ- मुरबाड रोड

रेल्वे गेट जवळ,नेरळ पुर्व **ॲड.कैलास अनंत बासरे**

मो.नं ७७९८४३३८८८

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील परिशिष्ठात वर्णन केलेली बिनशेती मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री.समीर बाळु राणे व श्री दयानंद देवीदास पाटील यांचेकडुन कायमची विकत घेण्याची ठरविलेली आहे. त्या बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकत परिशिष्ठ**

| सर्व्हे नंबर | हिस्सा/प्लॉट नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| ७१ | ३७ | ४.१८.०५ | ४२.०० |

तरी सदर बिनशेती मिळकतीबाबत इतर कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, बोजा, हक्क, हितसंबंध, कब्जा, साठेकरार, खरेदीखत, अखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, वारसाहक्क, इजमेंट हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या आत खालील नमुद केलेल्या पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत द्यावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास, वरील बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर बिनशेती मिळकतीच्या व्यवहाराची पुर्तता करतील. मुदतबाहय हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पत्ता :१०३, पांडुरंग धाम, नेरळ- मुरबाड रोड

रेल्वे गेट जवळ,नेरळ पुर्व **ॲड.कैलास अनंत बासरे**

मो.नं ७७९८४३३८८८

**जाहीर नोटीस**

आमचे आशिल डॉ. केदार अच्युत ओक, रा. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून व दाखवलेल्या कागदपत्रांवरून तमाम लोकांस या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की,

आमचे आशिलांलह दि. १०.०८.२००६ रोजीच्या नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र. २६८१/२००६ ने मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्रीबाग विकास योजना क्र. २ मधील सर्व्हे नं. १०१ बिनशेती प्लॉट नं. एम ३३ क्षेत्र २८० चौ.मी. ही मिळकत विकत घेतली आहे. दिनांक २५.०७.२०२४ रोजी सदर खरेदीखताचा मुळ दस्त मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथुन घरी प्रवास करत असताना कोठेतरी गहाळ झाला आहे. आमचे आशिलांनी त्याबाबत रेवदंडा पोलिस स्टेशनकडे दि. २६.०७.२०२४ रोजी लेखी अर्ज दिला असुन तो हरवलेल्या मालमत्तेचे रजि. मधील क्र. ०१८१/२०२४ कडे नोंद दाखल करण्यात आलेली आहे.

सदरचा दस्त जर कोणास मिळाला असल्यास तो तात्काळ आमचे आशिलांस परत करावा. तसेच सदरचे दस्ताचा कोणीही कोणत्याही प्रकारे गैरवापर करू नये. जर सदरहु दस्ताचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केल्यास त्यास आमचे आशिल जबाबदार राहाणार नाहीत व अशा व्यक्तीचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई आमचे आशिल करतील याची कृपया नोंद घ्यावी..

अलिबाग सही/-

दि. ३१.०७.२०२४ **ॲड. स्वप्ना अमित देशमुख**

आशिलांची सही पत्ता - वेधशाळेसमोर,

अलिबाग, ता अलिबाग, जि. रायगड.

**ग्रुप ग्रामपंचायत भाले, ता. माणगाव, जि. रायगड** **जाहीर निविदा** **नोटीस बोर्ड प्रसिद्धी दि. ३१/०७/२०२४**

ग्रुप ग्रामपंचायत भाले यांचेकडील १५ वा वित्त आयोग /ग्रामीण पाणीपुरवठा निधी/स्वच्छ भारत मिशन/ग्रा.पं. फंड अंतर्गत खालील कामांकरीता अधिकृत ठेकेदार/पुरवठादार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजित रक्कम | निविदा फी | इसारा फी | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | निविदा उघडणेचा दिनांक | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कांदळगाव खु. येथे धोबीघाट बांधणे | १५ वा वित्त आयोग | १०००००/- | २००/- | १०००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २ | भाले अंगणवाडीकरीता संरक्षक जाळी बसविणे | १५ वि.आ./ग्रा.पं. फंड | ४१०१४/- | २००/- | ४१०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ३ | भाले आदिवासीवाडी अंगणवाडीकरीता संरक्षक जाळी बसविणे | १५ वि.आ./ग्रा.पं. फंड | ४१०१४/- | २००/- | ४१०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ४ | व्यायामशाळेकरीता स्लाईडिंग विंडो बसविणे | १५ वा वित्त आयोग | ३००००/- | २००/- | ३००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ५ | भाले येथे गौरू माळी यांचे घरापासून बौद्धवाडी रस्तापर्यंत जोडरस्ता तयार करणे | १५ वा वित्त आयोग | ९३०४०/- | २००/- | ९३०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ६ | भाले हौदाची आळी सामाजिक सभागृहाकरीता स्वच्छतागृह बांधणे | १५ वा वित्त आयोग | ८००००/- | २००/- | ८००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ७ | रा.जि.प. शाळा बोंडशेत स्वच्छतागृह दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ४००००/- | २००/- | ४००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ८ | रा.जि.प. शाळा जावटे स्वच्छतागृह दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ९ | चांदेवाडी न.पा.पु. योजना साठवण टाकी शेड दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १० | रा.जि.प. प्राथ. शाळा बोंडशेत सुशोभिकरण करणे. | १५ वा वित्त आयोग | ३५०००/- | २००/- | ३५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ११ | कांदळगाव खु. येथे नदीला घाट बांधणे | १५ वा वित्त आयोग | ६२३००/- | २००/- | ६२३/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १२ | भाले स्मशानभूमी येथे पाणीसुविधा करणे | १५ वा वित्त आयोग | ६२०००/- | २००/- | ६२०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १३ | भाले न.पा.पु. योजना दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | ३४३३०/- | २००/- | ३४३/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १४ | बोंडशेत सार्व. शौचालयाकरीता स्वच्छता सुविधा करणे. | १५ वा वित्त आयोग | २५३८३/- | २००/- | २५४/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १५ | चांदेवाडी न.पा.पु. योजना साठवण टाकी स्लॅब दुरूस्ती करणे | १५ वा वित्त आयोग | १३०२५०/- | २००/- | १३०२/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १६ | ग्रामपंचायत कार्यालयाकरीता रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविणे | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | २००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १७ | अंगणवाडी केंद्र भाले येथे रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविणे | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | २००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १८ | अंगणवाडी केंद्र भाले-आदिवासीवाडी येथे रेनवॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २००००/- | २००/- | २००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| १९ | भाले-आदिवासीवाडी अंगणवाडीकरीता पाणीपुरवठा पाईपलाईन बसविणे | १५ वा वित्त आयोग | २५०००/- | २००/- | २५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २० | भाले-बौद्धवाडी सामाजिक सभागृहाकरीता पाणीसुविधा पुरविणे | १५ वा वित्त आयोग | १००००/- | २००/- | १००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २१ | बोंडशेत-बौद्धवाडी सामाजिक सभागृहाकरीता पाणीसुविधा पुरविणे | १५ वा वित्त आयोग | १००००/- | २००/- | १००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २२ | भाले- आदिवासीवाडी येथे विद्युत खांब बसविणे | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | २००/- | ५००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २३ | भाले येथे विद्युत खांब बसविणे | १५ वा वित्त आयोग | १२००००/- | २००/- | १२००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २४ | ग्रामपंचायत दुकानगाळे छप्पर दुरूस्ती व अंतर्गत दुरूस्ती करणे | ग्रा.प. फंड | ७५०००/- | २००/- | ७५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २५ | प्राथ. शाळा भाले स्वच्छतागृह छप्पर दुरूस्ती करणे | ग्रा.पं. फंड | १००००/- | २००/- | १००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २६ | भाले बौद्धवाडी समाजमंदिर अंतर्गत सुशोभिकरण करणे | ग्रा.प. फंड (१५%) | ७५०००/- | २००/- | ७५०/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २७ | भाले आदिवासीवाडी स्मशानभूमी परिसर सुशोभिकरण | ग्रा.प. फंड (१५%) | ५००००/- | २००/- | ५००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २८ | बोंडशेत बौद्धवाडी अंतर्गत रस्ता करणे. | ग्रा.प. फंड (१५%) | १०००००/- | २००/- | १०००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| २९ | भाले न.पा.पु. योजना पंपहाऊसला दरवाजा व संरक्षक जाळी बसविणे. | ग्रा.पा. पु. | ९००००/- | २००/- | ९००/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |
| ३० | जावटे येथे सार्वजनिक शोषखड्डे तयार करणे. | स्व.भा.मि./१५ वि.आ. | ६७२८८/- | २००/- | ६७३/- | ०९/०८/२०२४ | १२/०८/२०२४ | ६ महिने |

अटी व शर्ती:- १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. ०९/०८/२०२४ असून अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/ चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरी अंती ठेकेदार/ पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य / वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १०) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांचे निविदांचा विचार केला जाईल. ११) ठेकेदार/ पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. १२) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १३) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु.बांध.) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा.सरपंच प्रा. पं. भाले यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत भाले**
**ता. माणगाव, जि. रायगड**

निवडक

## पाण्यात बुडून मृत्यू

पनवेल : तालुक्यातील शिरवली-भेकरेवाडी या ठिकाणी धबधब्यावर पोहण्यासाठी गेलेल्या वीस वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. गुड्डू कुमार (राहणार नितळस, मूळ- बिहार) असे मृत तरुणाचे नाव आहे. सातजण धबधब्यावर पोहण्यासाठी गेले होते. दुपारी तीनच्या दरम्यान त्यांनी येथील कुंडात उडी मारली. गुड्डू कुमार याला पोहता येत नव्हते. पाण्याच्या वाढलेल्या प्रवाहात तो अडकला.

## तरुणीचे अपहरण

पनवेल : सोळा वर्षीय तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. धर्मेंद्र सिंग महतो हे शेडुंग येथील चाळीत राहत असून त्यांची मुलगी, पत्नी यांच्यासह ते कडी लावून झोपले होते. त्यांची पत्नी रात्री अकराच्या सुमारास उठली असता त्यांची मुलगी दिसून आली नाही व दरवाजाची कडी बाहेरून लावली होती. आजूबाजूला चौकशी केली असता मुलगी दिसून आली नाही. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## सोन्याच्या बांगड्या चोरल्या

पनवेल : सोन्याच्या बांगड्या पिशवीत ठेवतो सांगून फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रगती समीर मेकडे यांचे महालक्ष्मी स्टेशनरी अँड जनरल स्टोअर नावाचे स्टेशनरीचे दुकान धुतपापेश्वर कंपनीजवळ आहे. त्यांच्या दुकानात ५० ते ५५ वर्षाचा अनोळखी इसम आला आणि मंदिरात पैसे दान करा असे सांगितले. त्यावेळी जड वस्तू म्हणून सोन्याच्या बांगड्या ठेवण्यास सांगून त्या चोरुन नेल्या.

## विवाहिता बेपत्ता

पनवेल : घरातून खारघर येथे कामाला जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुश्मिता संजय पावटे (३०) असे तरुणीचे नाव आहे. तीची उंची अंदाजे ५ फुट, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे असून अंगात राखाडी रंगाचा पंजाबी कुडता व पांढऱ्या रंगाची लेगीज घातलेली आहे. माहिती असल्यास पोलीसांना कळवावे.

## पनवेल परिसरात मृतदेह

पनवेल : परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे असून, तो फिरस्ता इसम असल्याचे पोलिसांची प्राथमिक माहिती आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांच्याशी संपर्क साधावा.

# ‘मुद्रांक शुल्क’ जमिनीवर

### विक्रेत्यांना प्रशासकीय भवन जवळ जागा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुद्रांक शुल्क विक्रेत्यांसाठी नवीन प्रशासकीय भवन येथे जागा देण्यात आली असून तेथे विक्रेत्यांची दुकाने थाटली जात आहेत. त्यामुळे कर्जत तालुक्यातरील जनतेची जुन्या तहसील कार्यालयात टेकडीवर जाऊन मुद्रांक शुल्क खरेदी करण्याची कटकट आता थांबणार आहे.

कर्जत तहसील कार्यालय ब्रिटिश काळापासून टेकडीवर होते. मात्र मागील महिन्यात कर्जत शहरातील पोलीस मैदान परिसरात बांधण्यात आलेल्या प्रशासकीय भवन येथे ते हलविण्यात आले आहे. त्या कार्यालयात सर्व कार्यालयांचे स्थलांतरण करण्यात आले असून कर्जत तहसील कार्यालय ज्या प्रशासकीय भवन येथे आहे. त्या ठिकाणी सेतू कार्यालय देखील सुरू झाले असून तेथील शासकीय कामे केली जात आहेत. सध्या दहावी आणि बारावीचे निकाल लागले असून विद्यार्थ्यांना शासकीय दाखल्यांचे गरज आहे. त्यासाठी तालुक्यातील सर्व पालक आपल्या पाल्यांना घेवून कर्जत तहसील कार्यालय येथे येत आहेत. मात्र शासकीय दाखल्यांसाठी लागणारे मुद्रांक पेपर हे तहसील कार्यालय असलेल्या प्रशासकीय भवन येथे मिळत नाहीत. त्यामुळे मुद्रांक पेपर मिळविण्यासाठी तसेच त्यावर मजकुर टाईप करुन घेण्यासाठी पालकांना चालत चालत १५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या जुन्या तहसील कार्यालयात जावे लागत आहे. त्यामुळे एखाद्या कामासाठी तीन तास लागत होते त्या एका दाखल्यांचे कामासाठी दिवस जात आहे. कर्जत तहसील कार्यालय नवीन ठिकाणी आणि अर्ज टाईप करण्याची कामे जुन्या कार्यालयाबाहेर आहेत. त्यामुळे पालक वर्गात प्रचंड संताप असून कर्जत तहसील कार्यालयाच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली जात आहे

प्रशासकीय भवन मधील सेतू कार्यालयात केवळ दाखल्यांचे अर्ज मिळतात.मात्र त्या अर्जासोबत लावावे लागणारे मुद्रांक पेपर हे कर्जत तहसील कार्यालयात उपलब्ध होत नाही. तहसीलदार यांच्याकडे आलेल्या तक्रारी लक्षात घेऊन कर्जत तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय भवनच्या बाजूला अधिकृत मुद्रांक शुल्क विक्रेते यांच्यासाठी जागा देण्यात आली आहे. त्या ठिकाणी कार्यालय बांधण्याचे काम संबंधित मुद्रांक शुल्क विक्रेते यांच्याकडून सुरु आहे. त्याच मुद्रांक शुल्क विक्रेते यांच्या बाजूला प्रशासकीय भवन मध्ये शासकीय कामासाठी येणाऱ्या लोकांसाठी चहापानी, नाष्टा यांची दुकाने निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्क पेपरची खरेदी करण्यासाठी आता जुन्या तहसील कार्यालय असलेल्या टेकडीवर जाण्याचे कष्ट थांबणार आहेत.

**शासकीय दाखल्यांसाठी लागणारे मुद्रांक पेपर हे तहसील कार्यालयात मिळत नाहीत. त्यामुळे मुद्रांक पेपर मिळविण्यासाठी तसेच त्यावर मजकुर टाईप करुन घेण्यासाठी पालकांना चालत–चालत १५ मिनिटांच्या अंतरावर असलेल्या जुन्या तहसील कार्यालयात जावे लागायचे आता मात्र यातून सर्वांचीच सुटका होऊन त्रास वाचणार आहे. सर्वांनी समाधान व्यक्त केले आहे.**

# शहरात कचऱ्याचे साम्राज्य

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर



**। अलिबाग । वार्ताहर ।**

शहरात ठिकठिकाणी स्वच्छ अलिबाग सुंदर अलिबागचे फलक लावण्यात आले आहेत. मात्र शहराची स्वच्छतेबाबत अवस्था बिकट झाल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

अलिबाग शहराची लोकसंख्या सुमारे तीस हजारहून अधिक आहे. शहर पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठरत असताना अलिबाग जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी वेगवेगळी शासकिय, खासगी कार्यालये आहेत. पर्यटनासाठी अलिबागमध्येयेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पर्यटकांना चांगल्या सुविधा मिळाव्या यासाठी पालिकेकडून प्रयत्न केले जात आहेत. शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहवे यासाठी शहरातील स्वच्छता राखण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा तयार करण्यात आली आहे. काही कायम स्वरुपी व काही कंत्राटी कामगारांची सफाई कामगार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. स्वच्छतेसाठी लाखो रुपयांचा खर्च नगपालिकेकडून केला जातो. मात्र शहरातील स्वच्छता बिनभरोसे अशी झाली आहे. शहरात प्रवेश केल्यावर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे आहेत. स्वच्छ अलिबाग सुंदर अलिबागची जाहिरातबाजी फक्त नावापुरतीच राहिल्याचे चित्र दिसून येत आहे.

नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे शहरातील स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे. त्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. शहरातील अनेक भागात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे.

त्यामुळे अन्य आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या दोन वर्षापासून शहराचा कारभार प्रशासनाच्या भरोवश्यावर आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छतेबाबत मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# मुक मोर्चा नंतरही महावितरण सुस्त



**। नेरळ। प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील वीज समस्येवर कर्जतच्या जनतेने २० जुलै रोजी मुक मोर्चा काढून आपला संताप व्यक्त केला होता.त्यानंतर महावितरणने आपला कारभार सुधारावा म्हणून ३१ जुलैपर्यंत वेळ दिली होती. त्याआधी महावितरणकडून कर्जत तालुका वीज संघर्ष समितीला चर्चेला बोलावून घेतले. मात्र येरे माझ्या मागल्या प्रमाणे महावितरणकडून २० जुलै रोजी देण्यात आलेल्या निवेदनावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याचे समिती सदस्यांना दिसून आले आहे. दरम्यान, महावितरणचे या वेळकाढू धोरणाबद्दल संघर्ष समितीने संताप व्यक्त केला असून पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्याचा इशारा महावितरण कंपनीला देण्यात आला आहे.

कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीने २० जुलै रोजी मुक मोर्चा काढला आणि त्याच दिवशी महावितरण कंपनीला ग्रामीण आणि शहरी भागातील समस्यांचे निवेदन दिले. ३० जुलै २०२४ रोजी समितीचे सर्व पदाधिकारी महावितरण कार्यालयात त्यांनी दिलेल्या पत्रानुसार चर्चेला गेले होते. परंतु, उपअभियंता प्रकाश देवके यांना संघर्ष समितीच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनाचे तसेच चर्चेत कुठल्याही प्रकारचे योग्य उत्तर देण्याचे आणि ग्राहकांच्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न केला गेला नाही. त्यात कर्जत शहरात पाण्याचा मोठा प्रश्न आहे. तो सोडविण्यासाठी आवश्यक असलेला एक्स्प्रेस फिडरसाठी महावितरणने कोणतेही ठोस उत्तर दिले नाही.

जुने झालेले तसेच गंजलेले पोल संदर्भात कोणतीही पाहणी झालेले नाही. तसेच ते बदलण्याची कुठलीही तयारी दाखवली नाही. शहर आणि तालुक्याला लोड कमी करण्यासाठी नव्याने आवश्यक असलेले डीपी आणि ट्रान्सफॉर्मर शासनाकडे मागणीचा प्रस्ताव दिला नाही.

# धाटाव एमआयडीसीतील वायू प्रदूषण



**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसी कंपनीमधून हवेत सोडण्यात येणाऱ्या विषारी वायूमुळे या परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसत आहे. कंपनीवर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

धाटाव एमआयडीसी कंपनीतून हवेत सोडण्यात येणाऱ्या विषारी वायु नागरिकांच्या डोळ्यात जाऊन डोळे चूरचूरतात. त्यामुळे वाहन चालवताना हा धूर वाहन चालकांच्या डोळ्यात गेला तर डोळे चोळण्याच्या नादात समोरून येणारे वाहन दिसत नसल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या कंपनीतून सोडण्यात येणाऱ्या

### ■ कंपनीवर कारवाईची मागणी

विषारी वायूमुळे डोळे, नाक, तोंडाच्या वाटे फुफूसाच्या मार्गाने खोलवर प्रवेश करतो व त्यामुळे श्वसन संक्रमण, हृदयविकार, फुफूसाचा कर्करोग या सारख्या आजाराने लोकांचे जिवन धोक्यात आले आहे. या न्युरोलॉजिकल परिस्थितीमुळे संज्ञानात्मक कमजोरी आणि स्मुतीभ्रंश होण्याचा धोका वाढला आहे. सोडण्यात येणाऱ्या प्रमुख प्रदूषकांमध्ये कण, कार्बन मोनोऑक्साईड, ओझोन, नायट्रोजन डॉय ऑक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड यांच्या वायू प्रदूषणामुळे श्वसन व इतर आजार पसरत आहे.

# ‘महसूल सप्ताह यशस्वी करा’

**। अलिबाग । वार्ताहर ।**

महसूल विभागाच्या माध्यमातून दिनांक १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२४ या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या कालावधीत शासन निर्णयानुसार तालुक्यातील सर्व प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात येणार असून हा सप्ताह यशस्वी होण्यासाठी तालुक्यातील सर्व नागरिक, अधिकारी, कर्मचारी यांनी सहकार्य करण्याचे आवाहन तहसीलदार समीर घारे यांनी केले आहे. विविध योजनाची माहिती द्यावी आणि नागरिकांनी योजनांचा लाभ घ्यावा, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

# ब्रिटिशकालीन पूल इतिहासजमा होणार

### गांधारी नदीवर नवीन पूल; आठ कोटींचा निधी मंजूर

**। महाड । वार्ताहर ।**

मुसळधार पाऊस, पुराचा तडाखा सहन करत गांधारी नदीवर शंभर वर्षांपासून उभ्या असलेला ब्रिटिशकालीन पूल आता जीर्ण झाला आहे. त्यामुळे लवकरच नवीन पुलाची निर्मिती होणार असून त्यासाठी सुमारे आठ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.

पुढील महिन्यात पुलाच्या बांधकामासाठी निविदा काढण्यात येणार आहेत. त्यामुळे गांधारी नदीवरील ब्रिटिशकालीन पुलाचे अस्तित्व नामशेष होणार असून नवीन पुलामुळे वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरून महाड शहरात प्रवेश करताना गांधारी नदी ही सावित्री नदीला ज्या ठिकाणी मिळते तेथून काही अंतरावरच ब्रिटिशकालीन पूल आहे. १९२१ मध्ये हा पूल बांधण्यात आला. त्यानंतर तो रायगड जिल्हा परिषदेच्या ताब्यात देण्यात आला होता. पुलाच्या अलीकडील रस्ता महाड नगरपालिकेच्या ताब्यात; तर पूल व त्या पलीकडील शहरात प्रवेश करणारा रस्ता जिल्हा परिषदेच्या ताब्यात, अशी येथील स्थिती असल्याने पूल व रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न नेहमीच निर्माण व्हायचा. पावसाळ्यात दरवर्षी पुलावरून पाणी जाते. जुलै २०२१ मध्ये आलेल्या महापुरानंतर हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता; परंतु आता या पुलावरून एसटीवगळता सर्व प्रकारची वाहने ये-जा सुरू आहे.

जिल्हा परिषदेकडून करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये गांधारी नदीवरील पूल वाहतुकीस धोकादायक असल्याचा निष्कर्ष पुढे आल्याने या ठिकाणी नवीन पुलाची निर्मिती करावी लागणार आहे. नवीन पुलासाठी आठ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सुमारे ७० मीटर लांब व नऊ मीटर रुंद असा हा पूल उभारण्यात येणार आहे.

# रस्त्यावरील घोडे ठरताहेत वाहनचालकांची डोकेदुखी!



**। कोर्लई । वार्ताहर ।**

साळाव -मुरुड रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून उनाड गुरांच्या त्रासा बरोबर विहूर ते मजगांव दरम्यान रस्त्यावरील उनाडणारे घोडे वाहनचालकांची डोकेदुखी ठरत असून वाहनचालकांना आपली वाहने चालवताना कसरत करावी लागते आहे.

दरवर्षी प्रमाणे यंदाही पावसाळ्यात या रस्त्यावर बोर्ली, बारशिव, काशिद, नांदगाव मजगांव विहूर मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी उनाड गुरांचा ठिय्या असल्याचे चित्र दिसून येते. आता या रस्त्यावर उनाड घोडे वाहनचालकांची अक्षरशः डोकेदुखी ठरत असून वेळप्रसंगी रात्री अपरात्री अपघाताची भिती व्यक्त केली जात आहे.

ग्रामपंचायत तसेच शासनाच्या संबंधित विभागाने या प्रकरणी तातडीने लक्ष देऊन उपाययोजना करण्याची मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

# क्षयरोगमुक्त करण्यासाठी बैठक संपन्न



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायत क्षयरोग मुक्त करण्याचा निर्धार तालुकास्तरीय टि बी फोरमच्या बैठकीत करण्यात आला.

तहसीलदार यांच्या दालनात आयोजित केलेल्या बैठकीत समिती अध्यक्ष तथा तहसीलदार डॉ.शितल रसाळ, सह अध्यक्ष तथा गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, सचिव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव, नायब तहसीलदार सचिन राऊत, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अमित ओसवाल, फार्मसी संघटना अध्यक्ष शेखर बोराडे, सदस्य रामराव पाटील, पत्रकार संजय गायकवाड, आदींसह कर्जत तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र येथील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आशाताई उपस्थित होते.

डॉ. नितीन गुरव यांनी प्रास्ताविकात तालुक्यातील क्षय रुग्णा विषयी माहिती सांगितली. कर्जत तालुका क्षयरोग मुक्त कसा करता येईल यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला पाहिजे, आपल्या माध्यमातून शाळेच्या विद्यार्थ्यांच्यामार्फत जनजागृती फेरी, ग्रामपंचायतीमार्फत गावोगावी भिंतीवर पेंटिंग करण्यात येऊन याबाबतची जनजागृती करण्यात येणार आहे असे सांगितले.

कर्जत तालुका समिती अध्यक्ष तथा तहसीलदार डॉ. शितल रसाळ यांनी कर्जत तालुका मुक्त करण्यासाठी बैठकीत मार्गदर्शन सूचना केल्या व सर्वांनी मिळून तालुका क्षयरोग मुक्त करायचा संकल्प केला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रवींद्र माने यांनी केले.

### मानद कर्नल पदवी समारंभात अतिरिक्त महासंचालक योगिंदर सिंग यांचे गौरवोद्गार

# विद्यार्थ्यात राष्ट्रप्रेमाची भावना विद्यापीठाने रुजवावी !




**। माणगाव । प्रतिनिधी ।**

एनसीसी मुळे स्वयंशिस्त राष्ट्रप्रेम, कठोर परिश्रम व व्यक्तिविकास हे गुण वाढीस लागतात. हे विद्यापीठ अतिशय वेगळे व तांत्रिक असून सुद्धा येथे एनसीसीची मुळे खोलवर रुजली आहेत. यापुढे या विद्यापीठाच्या सलग्नीत महाविद्यालयात देखील एनसीसीच्या शाखा सुरु कराव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत व्हावी, असे गौरवद्गार अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगिंदर सिंग यांनी काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांना मानद कर्नल या मानाची व प्रतिष्ठेची पदवी बहाल करण्यात आली. त्या समारंभात ते बोलत होते .

पदग्रहण सोहळा नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्रेक्षागृहात संपन्न झाला. सदर मानद पदवी विशिष्ट सेवा पदक मिळवलेले व्हीएसएम अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगिंदर सिंग यांच्या शुभहस्ते बहाल करण्यात आली. सदर सोहळा कार्यकारी परिषदचे सदस्य, विद्या परिषदचे सदस्य तसेच विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला कार्यकारी परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण सरदेशमुख यांनी मनोगत व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल योगिंदर सिंग व कुलगुरू यांना धन्यवाद दिले. कुलगुरू यांचे अभिनंदन करून विद्यापीठ परिवाराला अभिमान वाटावा असा क्षण असल्याचे नमूद केले. याच बरोबर राष्ट्रप्रेम व राष्ट्रभक्ती वाढीसाठी एनसीसी गरजेचे आहे. याबाबत आपले विचार मांडले.

कुलगुरु यांनी सत्कार समारंभाला उत्तर देताना आपल्यावर कर्नल म्हणून जी नवीन जबाबदारी टाकली आहे. त्याचा आदरपूर्वक स्वीकार करुन या विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावना व राष्ट्रप्रेम निर्माण होण्यासाठी मिळालेल्या या बहुमानाचा निश्चितच वापर करता येईल अशी भावना व्यक्त केली. एनसीसी बाबत नवीन दिशा व दृष्टिकोन देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू यांनी ही मानद पदवी देण्यासाठी भारत सरकार, संरक्षण मंत्रालय, आर्मी, एनसीसी यूनिट, राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रीडा विभाग, मंत्रालय, सर्व अधिकारी वर्गाचे त्यांनी आभार व्यक्त केले.

# पाण्यात बुडून मृत्यू

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

अतिवृष्टीमध्ये रामराज येथील कुंडलिका नदीला पुर आला होता, यावेळी बोरघर येथील ७५ वर्षीय वयोवृध्द कमळाकर धर्मा म्हात्रे यांचा पुराचे पाण्यात बुडून मुत्यू झाला.

अलिबाग तालुक्यातील बोरघर येथील ७५ वर्षीय कमळाकर धर्मा म्हात्रे हे २२ जुलै २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता कुंडलिका नदी किनारी असलेल्या शेतीकडे, शेतीच्या कामासाठी गेले होते, परंतू दिवसभरात ते परत आले नाहीत म्हणून त्याचा मुलगा मिंलिद याने २३ जुलै २०२४ रोजी रेवदंडा पोलिस ठाणे येथे बैपत्ता झाल्याची तक्रार नोंदविली होती. परंतू २४ जुलै रोजी सायकांळी ५.०० वाजता त्याचे प्रेत कुंडलिका नदी पात्रात पाण्यावर तरगंत्या स्थितीत मिळून आले. कमळाकर धर्मा म्हात्रे यांचे शेत कुंडलिका नदी किनारी असल्याने तेथे पावसाने नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढल्याने नदीच्या पाण्यात वाहत जाउन बुडून मुत्यू झाले. त्याचा मृतदेह रेवदंडा पोलिसांनी ताब्यात घेतला, व अलिबाग येथील शासकीय रूग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला होता, तेथेच त्याच्या आप्तस्वकीयांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आला. याबाबत रेवदंडा पोलिस ठाण्याचे पोहवा सुजित सुरेश कुंभार हे अधिक तपास करीत आहेत. यावेळी घटना स्थळी रेवदंडा पोलिस ठाण्याचे प्रभारी सहा.पो.नि.श्रीकांत किरविले यांनी भेट दिली होती.

# जात काढणाऱ्यांची जात

देशातील जनतेला भाजप राजवटीने चक्रव्यूहात फसवले आहे अशी टीका लोकसभेत अर्थसंकल्पावर बोलताना राहुल यांनी केली. चक्रव्यूहाचे दुसरे नाव पद्मव्यूह होते असे सांगून त्यांनी भाजपचे निवडणूक चिन्ह असलेल्या कमळाशी याचा संबंध जोडला. देशातील शेतकरी कर्जाच्या, विद्यार्थी पेपरफुटी, बेकारी यांच्या, मध्यमवर्ग करांच्या चक्रव्यूहात अडकले आहेत असे राहुल यांचे म्हणणे होते. अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी अर्थ खात्यामध्ये अधिकाऱ्यांकरवी गोड शिरा करण्याचा एक प्रघात आहे. अर्थमंत्रीही त्यात सामील होतात. त्याचे फोटो सर्वत्र झळकत असतात. ते फोटो दाखवून राहुल यांनी या अधिकाऱ्यांमध्ये किती जण दलित किंवा मागास आहेत अशी विचारणा केली. राहुल यांच्या फैरीला भाजपने नेहमीप्रमाणे वाकड्यात जाऊन जबाब दिला. हा सर्व कट असल्याचे अर्थमंत्री निर्मला म्हणाल्या. अर्थसंकल्पावरची साधी टीका हीदेखील एक कारस्थान असल्याचे वाटावे यात भाजपच्या अकलेची तारीफ करावी तेवढी थोडी आहे. दुसरीकडे, ज्यांच्या जातीचा पत्ता नाही असे लोक (म्हणजे राहुल गांधी) जातगणना करण्याची मागणी करीत आहेत अशी टीका अनुराग ठाकूर यांनी केली. राहुल हे यांच्याबाबत जास्तीत जास्त खालच्या पातळीवर जाण्याचा भाजपने चंग बांधला आहे. त्यातून ते विरोधी पक्षनेते झाल्यापासून भाजप नेत्यांचे पित्त खवळले आहे. त्यामुळे पंतप्रधान त्यांना बालकबुध्दी ठरवू पाहतात तर बाकीचे नेते त्यांची जात विचारतात. विशेष म्हणजे ठाकूर यांना बाकीच्या भाजप सदस्यांनी जोरदार हसून दाद दिली व खुद्द पंतप्रधानांनीही ठाकूर यांची तारीफ केली. भारतात एखाद्याला जातीवरून हिणवणे हे गैर आहे. जवाहरलाल नेहरू हे हिंदू काश्मिरी ब्राह्मण होते. मात्र इंदिरा यांनी पारशी असलेल्या फिरोज यांच्याशी तर त्याचे पुत्र राजीव यांनी कॅथलिक ख्रिश्चन असलेल्या सोनियांशी लग्न केले. त्यामुळे राहुल यांची जात ठरवणे कठीण आहे हे खरेच. पण ठाकूर यांनी त्यांना हिणवणे हे दलितांना जातीवरून शिव्या देण्यापेक्षा कमी नव्हते.

### मोदींची दांभिक पिलावळ

नरेंद्र मोदी नावाचे एक अत्यंत दांभिक पंतप्रधान संसद सुरु होण्यापूर्वी तिची परंपरा कशी जपली पाहिजे यावर आव आणून बोलत असतात. पण त्यांच्या पक्षांचे नेते सर्व सभ्यता गुंडाळून ठेवून रस्त्यावरची टपोरी भाषा करतात तेव्हा मात्र ते त्यांना फटकारण्याऐवजी उलट त्यांचे कौतुक करतात. त्यांच्या भाषणाचा व्हिडिओ मोदी आपल्या ट्विटरवरून शेअर करतात. त्यामुळे मोदी आणि त्यांच्या पिलावळीकडून कोणत्याही गंभीर चर्चेची अपेक्षा ठेवणे व्यर्थ आहे. तुमची जात कोणती अशी विचारणा करणाऱ्या या लोकांची जात (म्हणजे प्रवृत्ती, हिंदू धर्मातली जात नव्हे) विषारी व नीच प्रकारची आहे एवढे मात्र नक्की. राहुल यांची जातगणनेची मागणी भाजपच्या मर्मावर बोट ठेवणारी आहे. एकीकडे दलित, शोषितांना आपणच न्याय दिला असे मोदी सांगत असतात. मात्र देशात जातगणना तर सोडाच पण साधी जनगणना करण्यासही ते तयार होत नाहीत. महाराष्ट्रात मराठा आरक्षणाच्या मागणीचा फायदा घेऊन ओबीसी विरुध्द मराठा अशा पेटवापेटवी करण्यात कोणाचा हात आहे हे सर्व जनता पाहते आहे. एकीकडे मराठा आरक्षण आपण आणले म्हणून डंका पिटायचा आणि दुसरीकडे देवेंद्रांच्या जवळच्या गुणवंत सदावर्ते यांच्यासारख्यांनी त्याला न्यायालयात आव्हान द्यायचे हा खेळ बराच काळ चालू आहे. आता तर विरोधकांवरच सर्व जबाबदारी आणि दोष ढकलण्याचा अजब प्रकार शोधण्यात आला आहे. मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षण देण्याबाबत उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी भूमिका स्पष्ट करावी म्हणून भाजपचे कार्यकर्ते मोर्चे काढत आहेत. राज्यात सत्ता शिंदे-फडणवीसांची. सगेसोयरे तरतूद करून त्याचे श्रेय मिरवले याच लोकांनी. आणि, आता ते अंगाशी येऊ लागल्यावर जाब विचारला जातो आहे विरोधकांना. जातगणनेच्या मागणी केली तर राहुल यांच्या जातीवरून त्यांची खिल्ली उडवा ही दिल्लीची शिकवण आहे. देवेंद्रपंतांचे अनुयायी महाराष्ट्रात त्याचे काटेकोर पालन करीत आहेत.

### राहुल यांनाही धडा

लोकसभा निवडणुका नुकत्याच झाल्या आहेत. राहुल आता कुठे विरोधी पक्षनेते झाले आहेत. त्यामुळे पुढची पाच वर्षे किंवा जोपर्यंत मोदी सरकार टिकेल तोवर भाजपचे हे नीच गुणधर्म आपल्याला पाहावे लागणार आहेत. ते पाहता राहुल यांनाही आता आपले डावपेच थोडे बदलायला हवेत. दलितांना प्रशासन किंवा एकूण समाजात महत्वाचे स्थान मिळत नाहीत हा मुद्दा ते अनेक दिवसांपासून मांडत आहेत. कोणत्याही पत्रकार परिषदेला गेल्यावर किती संपादक वा वरिष्ठ पत्रकार दलित समाजातील आहेत असा प्रश्न ते करतात. याच रीतीने अर्थसंकल्प करणाऱ्यांमध्ये किती मागासवर्गीय आहेत असा मुद्दा त्यांनी मांडला. आपल्या एकूण निर्णयप्रक्रियेत उच्चवर्णीयांचा वरचष्मा आहे हे त्यांना दाखवून द्यायचे होते. त्यांचा हा मुद्दा रास्तच आहे. गेल्या काही काळात भारत जोडो यात्रेतून व निवडणुकीच्या भाषणांमधून त्यांनी तो सर्वांपर्यंत पुरेसा पोचवला देखील आहे. मात्र लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून राहुल यांच्याकडून आता अधिक अपेक्षा आहेत. त्यांनी केवळ ही वरवरची टीका न करता, अर्थसंकल्पातील तरतुदींचा पर्दाफाश करणे व सरकारी धोरणांची, आकडेवारीची चिरफाड करणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने राहुल अजूनही निवडणुकीच्या प्रचाराप्रमाणेच बोलतात. आपण सत्तेत आलो तर जातगणना करू असे आता लोकसभेत सांगतात. त्याचा काही मतलब नाही. शेतकऱ्यांची कर्जे, बेरोजगारी किंवा मध्यमवर्गावरील कर यांचे अधिक सखोल विश्लेषण राहुल व त्यांच्या सहकाऱ्यांकडून येणे आवश्यक आहे. चक्रव्यूह, पद्मव्यूह अशी टीका मनोरंजक असली तरी गंभीर चर्चा पुढे नेणारी नाही. भाजप तर तुमची जात कोणती असे विचारून या चर्चेला भलतीकडे न्यायला टपलेलाच आहे. त्यांना कमीत कमी संधी मिळेल हे राहुल व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाहायला हवे. ठाकूर यांनी जात विचारूनही राहुल विचलीत झाले नाहीत हे चांगले झाले. पण त्यांना व निर्मला इत्यादींना अधिक ठोस मुद्द्यांवर बोलायला भाग पाडणे हेच राहुल यांचे खरे कसब असेल.

विचार

# प्रतीक्षा ऑलिम्पिकची, अपेक्षा पदकांची

***क्रीडा क्षेत्राचा कुंभमेळा म्हणजेच ऑलिम्पिक स्पर्धा यंदा जगातील सर्वात सुंदर शहरांपैकी एक असणाऱ्या पॅरिसमध्ये रंगत आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये भारतीय चमूकडून बऱ्याच अपेक्षा आहेत. भारतीय क्रीडापटूही या स्पर्धेत पदकांची लयलूट करण्यासाठी सज्ज झाले आहेत. यासोबतच ऑलिम्पिकच्या अर्थकारणाच्या चर्चाही चांगल्याच रंगल्या आहेत. अवघ्या जगात माहोल बनवणाऱ्या या आंतरराष्ट्रीय क्रीडा सोहळ्याविषयी.***




**अमृता वाडीकर**

टी-२० विश्वचषक, विम्बल्डन, कोपा अमेरिका आणि युरो चषकानंतर तमाम क्रीडाचाहत्यांना ऑलिम्पिकचे वेध लागले. ऑलिम्पिक क्रीडास्पर्धा म्हणजे सर्व क्रीडापटूंसाठी अनोखी पर्वणीच असते. या स्पर्धेत पटकावलेली पदके हा त्या खेळाडूसाठीच नाही तर त्याच्या देशासाठीही मोठा बहुमानच! सुवर्णपदक पटकावून राष्ट्रगीताची धून ऐकण्यासाठी खेळाडूंसोबतच त्यांच्या आणि त्यांच्या देशवासीयांचे कानही आसुसलेले असतात. यंदाचे ऑलिम्पिक पॅरिसमध्ये रंगले आहे. महत्त्वाची बाब म्हणजे तब्बल १०० वर्षांनी पॅरिसच्या भूमीवर क्रीडाक्षेत्राचा हा कुंभमेळा भरला आहे. याआधी पॅरिसने १९२४ मध्ये ऑलिम्पिकचे यजमानपद भूषवले होते. त्यामुळे फ्रान्सवासीयांच्या दृष्टीने या ऑलिम्पिकला विशेष महत्त्व आहे. भारतीय खेळाडूंचा चमू कोट्यवधी भारतीयांच्या अपेक्षांचे ओझे खांद्यांवर घेऊन ऑलिम्पिकच्या मैदानात उतरणार आहे. भारताचे ११७ खेळाडू सर्वस्व पणाला लावताना दिसणार आहेत. भारताच्या चमूत ७० पुरूष तर ४७ महिला खेळाडू आहेत. टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने विक्रमी सात पदकं पटकावली होती. यंदा भारत पदकांचा दुहेरी आकडा गाठेल, अशी अपेक्षा आहे. यंदाच्या ऑलिम्पिकमध्ये एकूण ३२ क्रीडाप्रकार असणार आहेत. त्यापैकी १६ क्रीडाप्रकारांमध्ये भारतीय खेळाडूंचा सहभाग असेल. कुस्ती, वेटलिफ्टिंग, नेमबाजी, तिरंदाजी, बॅडमिंटन, हॉकी, भालाफेक अशा खेळांमधून भारताला पदकाच्या अपेक्षा आहेत. भारताला कुस्तीमध्ये सर्वच पैलवानांकडून पदकाची अपेक्षा आहे. यंदा प्रथमच भारताच्या पाच महिला कुस्तीपटू ऑलिम्पिकच्या आखाड्यात उतरत आहेत.

अमन सेहरावत या कुस्तीपटूकडून देशाला पदकाची अपेक्षा आहे. भारताच्या कुस्तीपटूंनी आतापर्यंत १९ वेळा ऑलिम्पिकध्ये भाग घेतला आहे. त्यात त्यांनी एकूण सात पदके (दोन रौप्य, पाच कांस्य) जिंकली आहेत. देशासाठी कुस्तीतील पहिले ऑलिम्पिक पदक खाशाबा जाधव यांनी जिंकले. १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये ५७ किलो वजनी गटात त्यांनी हे पदक जिंकले होते. योगायोगाने, या वेळी अमनदेखील त्याच वजनश्रेणीत प्रवेश करेल. विश्चषक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता (कंपाऊंड तिरंदाजी) अभिषेक वर्मा या वेळी ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणार नाही. भारताचा तिरंदाजीशी फार जुना संबंध आहे. पण, आजपर्यंत ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकता आलेले नाही. भारतीय तिरंदाजी संघ खूप मजबूत असल्यामुळे पॅरिसमध्ये तीन पदके जिंकू शकतो. गेल्या काही वर्षांपासून हा संघ सातत्याने वरच्या स्तरावर चांगली कामगिरी करत आहे. या वेळी संघाचा ताळमेळ उत्तम दिसतो. पुरुषांच्या संघात तरुणदीप राय, प्रवीण जाधव, धीरज बोम्मादेवरा हे त्रिकूट आर्मीचे असून दीर्घ काळापासून एकत्र प्रशिक्षण घेत आहे. तिघेही एकमेकांसोबत जास्तीत जास्त वेळ घालवतात. त्याचा परिणाम सांघिक स्पर्धांमध्ये नक्कीच दिसून येईल, असा विश्वास आहे. भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा पदक मिळवणारच असा ठाम विश्वास भारतीय क्रीडाप्रेमींना आहे. टोकियो ऑलिम्पिकमधल्या सुवर्णमयी कामगिरीनंतर नीरजने सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. त्यामुळे नीरजचं पदक जवळपास निश्चितच आहे.

वेटलिफ्टर मीराबाई चानूही भारतााला पदक मिळवून देऊ शकते. मधल्या काळात मीराबाईला काही दुखापतींना सामोरं जावं लागलं. मात्र तिची सकारात्मकता नक्क्कीच पदक मिळवून देऊ शकते. बॅडमिंटनमध्ये अर्थातच पी.व्ही. सिंधूकडून अपेक्षा आहेत. तिने दोन ऑलिम्पिक पदकं जिंकली आहेत. तीन ऑलिम्पिक पदकं जिंकून इतिहास घडवण्याची संधी तिला आहे. यासोबतच सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुरूष दुहेरीत पदक पटकावू शकतात. यासोबतच बॉक्सर लव्हलिना बोरगेहेन, निखत झरीन, गोल्फर आदिती अशोक, कुस्तीपटू विनेश फोगाट, अंतिम पंघाल, नेमबाज सिफ्ट कौर सामरा यांच्याकडून पदकाची अपेक्षा आहे. भारतीय पुरुष हॉकी संघ यावेळी काय कमाल करणार याकडेही सर्वांचं लक्ष असेल.

ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय हॉकीचा सुवर्ण इतिहास आहे. भारताला १९२८ मध्ये पहिल्यांदा ऑलिम्पिकमध्ये हॉकी खेळण्याची संधी मिळाली आणि ध्यानचंद यांच्या १४ गोलच्या जोरावर संघाने पहिल्यांदा सुवर्णपदक जिंकले. इथून ऑलिम्पिकमध्ये हॉकी इंडियाची सुवर्णकथा सुरू होते. त्यानंतर १९३२, १९३६, १९४८, १९५२ आणि १९५६ मध्ये सुवर्णपदके जिंकली. भारताने १९६४ आणि १९८० मध्येही सुवर्ण जिंकले होते. त्यानंतर संघाला हॉकीमध्ये सुवर्ण जिंकता आलेले नाही. मात्र, टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकून संघाने हॉकीमध्ये देशाचे चैतन्य जागृत केले आणि सुवर्णपदकाची शक्यता वाढवली आहे.

प्रेम आणि फॅशनची नगरी असणाऱ्या पॅरिसमध्ये यंदाचे ऑलिम्पिक पार पडत आहे. असंख्य रोमँटिक कादंबऱ्या, चित्रपट आणि गाण्यांमधून पॅरिसला प्रेमाचे शहर म्हणून संबोधण्यात आले आहे. सुंदर इमारती आणि आरामदायक कॅफे हे शहर अधिक रोमँटिक बनवतात. आता हे प्रेमाचे शहर चुरशीचे, स्पर्धेचे शहर बनेल. सुवर्णपदक जिंकण्यासाठी खेळाडू सर्वतोपरी प्रयत्न करतील. मात्र, या वेळी या 'सिटी ऑफ लव्ह'मध्ये प्रेमाची कथाही लिहिली जाणार आहे. या वेळी अशी अनेक जोडपी ऑलिम्पिकमध्ये सहभागी होत आहेत, जी एक तर एकाच संघाचा भाग आहेत किंवा एकमेकांचे प्रशिक्षक आहेत.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये जगातील दहा हजारांहून अधिक खेळाडू पदक जिंकण्याचा प्रयत्न करतील. विविध खेळ आणि खेळाडूंसोबतच ऑलिम्पिकच्या अर्थकारणाच्या चर्चाही चांगल्याच रंगतात. ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन प्रचंड खर्चिक असते. यजमान देश कितीही श्रीमंत आणि संपन्न असला तरी जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देताना नाकी नऊ येतात. जाणकारांच्या अंदाजानुसार ऑलिम्पिक आयोजनाचा सरासरी खर्च सुमारे १२ अब्ज डॉलर्सपर्यंत असतो. टोकियो ऑलिम्पिकसाठी जवळपास २० अब्ज डॉलर्स खर्ची पडले. ऑलिम्पिकचे आयोजन प्रतिष्ठेचे असले तरी यजमान देशाला पायाभूत सोयीसुविधांवर प्रचंड खर्च करावा लागतो. त्यातही क्रीडास्पर्धांसाठीच्या सुविधा प्रामुख्याने उपलब्ध करून द्याव्या लागतात. यासोबतच दळणवळणाच्या सुविधा वाढवाव्या लागतात. खेळाडू, पत्रकार, कर्मचारी आणि जगभरातून येणाऱ्या क्रीडाचाहत्यांच्या राहण्याची सोयही करावी लागते.

एका अहवालानुसार चीनने बीजिंग ऑलिम्पिकसाठी ४५ अब्ज डॉलरपैकी अर्धी रक्कम रेल्वेसेवा, विमानतळे आणि रस्त्यांच्या विकासासाठी खर्ची घातली होती. यासोबतच सुरक्षा तसेच अन्य बाबींवरही खर्च करावा लागतो. पॅरिस ऑलिम्पिकसाठी १० अब्ज डॉलर्सहून अधिक खर्च येईल असा अंदाज आहे. त्यापैकी १.७ अब्ज डॉलर्स आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने दिले आहेत. ऑलिम्पिक आयोजनानंतर यजमान देशाला आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. मात्र एका अहवालानुसार ऑलिम्पिकमुळे पॅरिसला जवळपास १२.२ अब्ज डॉलर्स एवढा नफा होण्याचा अंदाज आहे. असे असले तरी ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन आर्थिकदृष्ट्या धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे आता फ्रान्सला नफा होणार का तोटा हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

ऑलिम्पिकचे बिगुल आता वाजले आहे. खेळांचा हा कुंभमेळा पुढचे काही दिवस सुरू राहणार आहे. पॅरिसच्या भूमीत पदकांची लयलूट होणार आहे. भारतीय खेळाडूंनी लौकिकास साजेशी कामगिरी करून, पदके जिंकून देशाचे नाव उंचवावे हीच सर्व भारतीय क्रीडाचाहत्यांची अपेक्षा आहे.

आजकाल

# भाजप म्हणजे भारतीय जाहिरात पक्ष

**विश्वंभर चौधरी**

परवा एक पोस्ट पाहिली. जळगावच्या पोलीसांनी काही मोबाईल चोर (बिगर राजकीय) पकडले. पोलीसांनी चोरांकडून रिकव्हर केलेले फोन मंत्री गिरीश महाजन यांच्या शुभहस्ते परत करण्याचा कार्यक्रम झाला! या कार्यक्रमाचे फोटो सोशल मिडीयावर इतके झळकले की चोरी गेलेल्याची भरपाई म्हणून भाजपानं आपद्ग्रस्तांना मोबाईल फुकट वितरीत केले असा लोकांचा समज व्हावा! म्हणजे मोबाईल लोकांचे, चोरले चोरांनी, पकडले पोलीसांनी आणि श्रेयाचे धनी गिरीश महाजन

आणि आता या महिलांना न विचारताच त्यांच्यावर लाडक्या बहिणी असल्याचा शिक्का बसला.

गीतेत सांगितलं आहे की वयानं मोठी माणसे जशी वागतात, तसंच आचरण त्यांचे छोटे छोटे अनुयायी करतात.

मोदींची जाहिरातबाजीची सवय फक्त मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीच नाही तर आमदारांच्याही अंगवळणी पडली आहे.

शिंदे-फडणवीस सरकार जातांना नुसतंच तिजोरी रिकामी करून जाणार नाही तर राज्यावर प्रचंड कर्ज करून जाणार आहे.

लोकांच्या शाश्वत विकासाचा, कायमस्वरूपी रोजगाराचा, शेतीचा दर्जा सुधरण्याचा, शेतकरी आत्महत्या थांबवण्याचा कोणताही कार्यक्रम नसलेलं एक बुद्धीदरिद्री सरकार म्हणून या सरकारची इतिहासात नोंद होईल. 'खात्यात थेट पैसे' हे निवडणुकीसाठीचं एक मिथक आहे. 'लाडकी बहीण' योजनेसाठी किती महिन्यांची तरतूद आहे हे सरकारनं जाहीर करावं.

करदात्यांचे पैसे स्वतःचा फोटो लावून लोकांना वाटणे म्हणजे सरकार चालवणे नव्हे. फक्त आम्ही विरोधकांवर कशी कुरघोडी केली हे सांगत बसणं हेच सरकारचं एकमेव काम नाही.

इथं करदाता म्हणतांना फक्त इन्कम टॅक्स भरणारे लोक अभिप्रेत नाहीत, साधी काडीपेटी घेणारा गरीब माणूस सुद्धा त्या काडीपेटीवर जीएसटी भरतो आणि म्हणून तो ही करदाताच असतो.



शेतकरी आत्महत्या दररोज वाढत असतांना, शेती रसातळाला जात असतांना तुम्ही कोणती दीर्घकालीन उपाययोजना केली? असा प्रश्न इतिहास कधीच विचारणार नाही या भ्रमात राहू नका.

वाड्यावस्त्यांवरच्या शाळा पटसंख्येचं कारण दाखवून बंद केल्या. मराठी शाळा तर जवळपास संपवत आणल्या.

गावातल्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था काय आहे? 'लाडकी बहीण' आजारी पडली की तिला खाजगी दवाखान्यात महागडी सेवा घ्यावी लागते त्याचं काय करायचं?

युडीसीपीआरमधून वाट्टेल तसा एफएसआय वाढवून दिल्यामुळे शहरातल्या मूलभूत सुविधाच कोलमडत आहेत. रस्ते, पाणी आणायचं कुठून? पूर आला तर नियंत्रित कसा करायचा?

मूळ प्रश्न बाजूला ठेवायचे आणि दर पंधरा दिवसाला लोकांना काहीतरी चकचकीत दाखूवन टाईम पास करायचा असा खेळ चालला आहे.

अधिवेशन भाजपाचं आणि बटबटीत झालं पुणे शहर. पुण्यात सर्वत्र असे बेकायदेशीर आणि अनधिकृत बॅनर्स लावून सत्ताधारी पक्ष स्वतःच हायकोर्टाच्या आदेशाची राजरोस पायमल्ली करत आहे. यात पंतप्रधानांपासून भाजपाच्या किरकोळ कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांचे फोटो आहेत. यातील कोणालाही हायकोर्टाची ऑर्डर माहीत नसेल का? की सत्तेची मग्रुरी इथपर्यंत गेली की आम्ही देशातल्या संवैधानिक न्यायालयाचा आदेश पण मानत नाही? हायकोर्टानं अशा अनधिकृत बॅनर्सवर कडक शब्दात पूर्वीच बंदी घातलेली आहे.

आणि पुन्हा संविधानाचा मुद्दा उपस्थित केला तर हे 'खोटा नॅरेटीव' म्हणत स्वतःच आरडाओरडा करणार!

हा उघडउघड घटनाद्रोह दाखवला तर वर 'ठोकून काढणार' का?

पोलीस आणि महापालिका झोपले आहेत का?

**(साभार)**

**लोकसंसद**

### विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या चिंताजनक

मुंबई उच्च न्यायालयात सामाजिक कार्यकर्त्यांकडून दाखल केलेल्या एका जनहित याचिकेत नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार महाराष्ट्रात २०१९ साली १ हजार ४८७, २०२० मध्ये १ हजार ६४८ आणि २०२१ मध्ये १ हजार ८३४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे नमूद केले आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत समुपदेशकांची मदत घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाला सर्व संलग्न महाविद्यालयांना परिपत्रक जारी करण्याचे निर्देश द्यावेत अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे. या अनुषंगाने महाराष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील वाढत्या आत्महत्येची संख्या चिंताजनक असून या संदर्भात 'मानसिक आरोग्यासह प्रत्येक विद्यार्थ्याचे आरोग्य हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्याचा अविभाज्य भाग आहे' असे स्पष्ट करत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग आणि मुंबई विद्यापीठाला प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. तसेच महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार महाविद्यालयांमध्ये आत्महत्या होणार नाहीत यासाठी महाविद्यालय, विद्यापीठात आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे हे विद्यापीठाचे कर्तव्य असल्याचे म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालयाच्या आदेशाची दखल घेऊन महाविद्यालयांमध्ये

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१ ऑगस्ट**

**१८५७:-** अध्यात्म व तत्त्वज्ञानविषयक लेखक रामचंद्र शंकर टाकी यांचा जन्म. त्यांची ग्रंथसंपदा परमार्थ विषयक आहे. 'पुरुषार्थ-दीपिका' हा त्यांचा पहिलाच ग्रंथ ७०० पृष्ठांचा असून त्यात मोक्षप्राप्तीच्या साधनांचा ऊहापोह केला आहे. त्यांचे 'लघुबोध' हे पुस्तक पुरुषार्थ-दीपिकेचे सारांश रुप असून संत ज्ञानेश्वरांवर त्यांनी 'श्री ज्ञानेश्वर महाराज' हे पुस्तक लिहिले. **१८७९:-** चतुरस्त्र लेखक, पत्रकार व नाटककार अच्युत बळवंत कोल्हटकर यांचा जन्म. १९१५साली त्यांनी काढलेल्या 'संदेश' ने मराठी वृत्तपत्रांना आधुनिक रुप दिले. १० नाटके, २ कादंबऱ्या व २ कथासंग्रह त्यांनी लिहिले आहे. **१८८९:-** लेखक, पुरोगामी विचारवंत, खासदार शंकरराव सखाराम मोरे यांचा जन्म. 'प्राथमिक शिक्षण' या महवाच्या ग्रंथाशिवाय 'बजरंग' ही द्विखंडात्मक कांदबरी. 'वेडे वात्सल्य' हे नाटक आणि 'मानवेतरांच्या मुलाखती' असे विविध प्रकारचे ललित लेखन त्यांनी केले. **१९१५ :-** कथा-कादंबरीकार अनुवादक श्रीकृष्ण जनार्दन जोशी यांचा जन्म. ३५ कथासंग्रहासह काही अनुवादीत कादंबऱ्या त्यांच्या प्रसिध्द. तथापि 'आनंदी गोपाळ' या त्यांच्या कादंबरीने चरित्रात्मक कांदबरीचा प्रवाह त्यांनी मराठीत आणला. **१९२०:-** कथा-कादंबरीकार व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म. त्यांनी १४ लोकनाटये, २५ कादंबऱ्या व १३ कथासंग्रह लिहिले. **१९२०:-** विद्वता, अभ्यास आणि परखड लेखणी यांची सांगड राजकारणाशी घालणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे देहावसान. 'ओरायन','आर्क्टिक होत ऑफ द वेदाज' आणि 'गीतारहस्य' हे त्यांचे ग्रंथ. तसेच 'केसरी' व 'द मराठा' चे संपादक म्हणून त्यांनी लिहिलेल्या लेखांचे समग्र संग्रह आजही वाचले जातात. **१९२६:-** राष्ट्रीय शिक्षणातले शिवाजी असे ओळख असणारे लेखक, विचारवंत विष्णू गोविंद विजापुरकर यांचे निधन. 'ऋग्वेद ऋक् संग्रह' हे एम ए च्या विद्यार्थ्यांकरता व ऋग्वेदातील निवडक उताऱ्यांचे संकलन आणि फ्रीमनकृ त युरोपचे सक्षिप्त इतिवृत्त' हे ग्रंथ त्यांनी लिहिले. **१९२८:-** लेखिका सुलभा साठे तथा माई यांचा जन्म. माईंनी 'श्री गुरुदर्शन','पीयूषधारा','स्मृती मंजुषा' हे वसंत पाटणकर यांच्या सहकार्याने आदी पुस्तकांचे लेखन केले. **१९३४:-** सुश्मजीव शास्त्र सल्लागार लेखिका डॉ. लिना देवधर यांचा जन्म. पेशाने डॉक्टर असणाऱ्या 'सांसर्गिक आजार भाग १,२' या पुस्तकातून संसर्गजन्य आजारांची माहिती दिली असून 'एडस' ह्या महाभयंकर आजारावरही त्यांनी पुस्तक लिहिले आहे. याशिवाय मराठी वर्तमानपत्रातून स्वास्थ्यविषयक लेखन त्या करतात. **१९४१:-** लेखक शंकर विठोबाजी विरणकर यांचा जन्म. 'मातीच्या चांदण्या' हा काव्यसंग्रह, 'वनाची शाळा','मौजच मौज', 'लाडके आजोबा', 'खारुताईचे लग्न' या बालकाव्य संग्रहासह 'चकोर' हा गझलसंग्रह प्रसिध्द. **१९४४:-** दै. लोकसत्तेमधून 'सफर कालपर्वाची' या सदरातून जागतिक घडामोडीवर मुशाफिरी करणाारे सुनित विष्णू पोतनीस यांचा जन्म. दै. लोकसत्तेतील 'बखर संस्थानिकांची' हे त्यांचे आणखी एक लोकप्रिय सदर. यावरील पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. तसेच दै. लोकसत्तेतून 'नगराख्यान' या सदरातून त्यांनी जगातील प्रसिध्द शहरांचा इतिहास साकारला आहे. **१९४७:-** लेखक, राष्ट्रभाषा पंडित साप्ताहिक ओळखचे संपादक प्रा. देवगौडा आण्णा पाटील यांचा जन्म. ह्यांच्या लेखन संपदेत 'अधर्म', 'आत्मघात', 'गंधवेडा', 'बानू' मिळून वीसहून अधिक कादंबऱ्या, 'स्वप्नफळांचे झाड' ही कादंबरीका आणि 'फरारी' हा कथासंग्रह अशी साहित्य संपदा. **१९४९:-** ज्येष्ठ साहित्यिका सीता रमेश ओवळेकर यांचा जन्म. वृत्तपत्रे, मासिकातून काव्य, ललित लेख लिहिणाऱ्या सीताताईची आतापर्यंत सहा पुस्तके प्रसिध्द झाली असून 'सांजवात' या पुस्तकातील एक उतारा त्यांच्याच हस्ताक्षरात 'लिमका बुक' मध्ये समाविष्ठ करण्यात आला. 'सृजन', 'सायंकाळ','सांजदीप' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द. याशिवाय हिंदीतूनही त्यांनी लिखाण केले. **१९४९:-** लेखनाबरोबर अभिनय आणि दिग्दर्शन या क्षेत्रात ठसा उमटवणारे आकाशवाणीवरील श्रृतिकेतील कलावंत रमेशचंद्र भाऊराव दिक्षित यांचा जन्म. 'अशी पाखरे येती' ही बालनाटिका यांच्या नावावर आहे. **१९५१:-** कवी, साप्ताहिक 'प्रबोधन'चे संपादक अमृत नारायण बनसोड यांचा जन्म. 'स्मृतिगंध' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५२:-** लेखक शशिकांत नंदकुमारराव सेलूकर यांचा जन्म. 'सद्गुरु अंबादास महाराजांचे चरित्र' त्यांनी लिहिले आहे. **१९५७:-** लेखक डॉ. विनायक तुकाराम यांचा जन्म. 'आदिवासी साहित्य : स्वरुप व समीक्षा' या ग्रंथासह 'गोंडवन पेटत आहे' हा काव्यसंग्रह आणि 'धरती आबा', 'गोंडवनातील क्रांतीवीर नारायण सिंह','उईके आणि संत भृगूशंडी आदींची चरित्रे लिहिलीत. **१९६१:-** लेखक अच्युत प्रसाद बन यांचा जन्म. ह्यांची परिक्रमा 'पश्चिम युरोपची','केनियन सफारी','जर्नी टू गुडहोप', 'मोश मोशी जपान', 'व्हायकिंगच्या प्रदेशात', 'ऑस्पोलियन अपूर्वाई', 'इस्तंबूत ते अथेन्स' अशी प्रवासवर्णन प्रसिध्द. **२००६:-** साहित्यिक श्री. पू. गोखले यांचे निधन. 'मृगनयना', 'महाराणी पद्मिनी' या ऐतिहासिक कादंबऱ्या. 'झेप आणि झुंज' ही सावकरांच्या कार्यावर प्रकाश टाकणारी नाटके मिळून १२ पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ ऑगस्ट

१) श्री. देहू विष्णू खेत्री
विद्यानगर, १-८-१९३८
२) श्री. महादेव रामा भगत
बामणगाव, १-८-१९४०
३) श्री. गजानन धर्मा मढवी
चेंढरे, १-८-१९५०
४) श्री. अशोक नथू काकडे
पिंपळभाट, १-८-१९५६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल


# नुकसान टाळण्यासाठी एकत्र

## ■ गटनिहाय बैठक घेण्याचा शेतकऱ्यांचा निर्णय

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

**शासनाच्या शेतीविषयक धोरणाचा आढावा घेऊन शेतीचे होणारे नुकसान कसे टाळता येईल, याबाबत शेतकऱ्यांची भूमिका महत्वाची ठरणार आहे. यासाठी १ ऑगस्टपासून जिल्हा परिषद गटनिहाय समृद्ध कोकण अभियान संस्था आणि रत्नागिरी जिल्हा आंबा उत्पादक संघ, रत्नागिरीतील शेतकरी संघटना यांची संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे, असे प्रकाश साळवी यांनी सांगितले.**



राज्य शासन विकासाच्या सर्वच स्तरावर कोकणाला खड्यासारखे बाजूला ठेवत आलेले आहे. पर्यटन विकास आणि रोजगार निर्मिती करणे शक्य असतानाही केंद्र शासन आणि राज्य शासनाने कोकणात प्रदूषण निर्माण करणारे कारखाने देण्याच्या नावाखाली कोकणातील शेती आणि शेतकरी दोघांनाही संपवण्याचा चंगच बांधला आहे. येथील शेतकऱ्यांचे प्रतिकूल नैसर्गिक वातावरणामुळे मोठ्या मेहनतीने निर्माण केलेले शेती पिक ऐन काढणीवेळी वादळवारे आणि पाऊस यामुळे मातीमोल होत आहेत. सरकार आणि राजकारणी सर्वेशिवाय शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडू देत नाहीत. कर्जमाफी, व्याजमाफीसारख्या योजना बँका आणि सरकारच्या कागदावरून शेतकऱ्यांच्या पासबुकपर्यंत सरकतच नाहीत. याचा अनुभव गेली अनेक वर्षे इथला शेतकरी घेत आहे.शेतकरी मेला तरी चालेल; परंतु शेतकऱ्यांपेक्षा इथली उपद्रवी माकडे जगावीत, अशी इथल्या राजकारण्यांची व शासनाची भूमिका आहे. इथला शेतकरी माकडे हाकलून मरतोय आणि त्यासाठी त्याला उत्पन्नाचा सुमारे ७५ टक्के भाग खर्च करावा लागतो आहे. वातानुकूलित कार्यालयात बसून राजकारभार चालवणाऱ्या नेत्यांना भान नाही.

यासह विविध प्रश्नांवर चर्चा करून शेतकरी एकजूट निर्माण करण्यासाठी सर्वपक्षीय, सर्व सामाजिक आणि शेतीविषयक कार्य करणाऱ्या संघटनांची जिल्हा परिषद गटनिहाय बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्टला सकाळी ९ वा. शिवार आंबेरे येथून बैठकीला सुरवात होईल. त्यानंतर हरचिरी, पावस येथे बैठक होईल. २ ऑगस्टला निवळी, करबुडे, खंडाळा आणि गणपतीपुळे अशा चार ठिकाणी बैठकांचे नियोजन केले आहे. ७ ला दुपारी ३ वा. रत्नागिरीतील विवेक हॉटेलच्या मैदानावर संयुक्त सभा होणार आहे, असे साळवी यांनी सांगितले.

### विम्याचे हप्ते शेतकऱ्यांची अडचण

**शेतीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकार विविध कंपन्यांना विमा काढण्याची परवानगी देते. विम्याचे हप्ते हे शेतकऱ्यांना अडचणीचे आहेत. नुकसान झाल्यावर कधीही विम्याची रक्कम वेळेवर मिळत नाही. या कंपन्याचे एजंट शेतकऱ्यांकडे विमा काढण्यासाठी येताना गोड गोड बोलतात; परंतु नुकसान होते आणि भरपाई द्यायची वेळ येते तेव्हा हात वर करतात, असे साळवी यांनी सांगितले.**




# लोकअदालतीत ५१ प्रकरणे निकाली

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

वेंगुर्ले येथील दिवाणी न्यायालयात २७ जुलैला झालेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दिवाणी, फौजदारी व वादपूर्व ३१ अशी एकूण ५१ प्रकरणे तडजोडीने मिटविण्यात आली. यावेळी दिवाणी, फौजदारी व वादपूर्व प्रकरणांतील मिळून एकूण १३ कोटी ७८ लाख ६ हजार ७७३ रुपये वसूल करण्यात आले आहेत. वेंगुर्ले तालुका विधी सेवा समिती व तालुका बार संघटना, वेंगुर्ले यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायालय, वेंगुर्ले येथे शनिवारी (दि.२७) राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. वेंगुर्ले तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा दिवाणी न्यायाधीश डी.वाय. रायरीकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. तालुक्यातील दिवाणीकडील २ प्रकरणे, फौजदारी कडील १८ प्रकरणे, ग्रामपंचायत पाणीपट्टी, घरपट्टी, विवीध बँका व विद्युत विभाग, वेंगुर्ले यांच्याकडील ३१ वादपूर्व प्रकरणे अशी ५१ प्रकरणे तडजोडीने मिटविली. पॅनेलप्रमुख म्हणून न्यायाधीश रायरीकर व पॅनेल सदस्य म्हणून ॲड. पूनम नाईक यांनी काम पाहिले. यावेळी न्यायालयाचे सहाय्यक अधीक्षक, एस. एस. कांबळे, एस. के. खेडेकर आदी सहभागी झाले.

# मान्सून महोत्सव उत्साहात

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकणचे सुपुत्र कुणाल सरमळकर पुरस्कृत आणि उत्साही मित्रमंडळ म्हापण यांच्यावतीने पाट-देऊळवाडा येथील शरयू मंगल कार्यालयात दि. २५ व २६ जुलैला मॉन्सून महोत्सव उत्साहात संपन्न झाला. महोत्सवाचे उद्घाटन सरमळकर यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद माजी सभापती विकास गवंडे यांच्या हस्ते झाले. या दोन दिवसीय दशावतार नाट्यमहोत्सवात दशावतारप्रेमी नाना केळुसकर यांच्या संकल्पनेतून पहिल्या दिवशी गुरुवारी (दि.२५) युवा कलाकारांचा 'कर्ण दिग्विजय' तर दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.२६) ज्येष्ठ दशावतार कलाकारांच्या संचात 'नैमिषारण्य निर्मिती' हे नाट्य प्रयोग सादर करण्यात आले. या नाट्यप्रयोगांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य गुरुनाथ मडवळ, पल्लवी सरमळकर, कांची सरमळकर, भाविका खानोलकर, दाजी जुवाटकर, नाट्यरसिक व अन्य मंडळी उपस्थित होती.

# मुलांच्या मृत्युमुळे उपासमारीची वेळ

**सिंधुदुर्ग :** सोनवडेतर्फे कळसुली येथील घरातील दोन मुलं सुजल राणे व सचिन राणे यांचा राधानगरी येथे अपघाती मृत्यू झाला होता. दोन्ही मुले ही कुटुंबातील कर्ती असल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच, या मुलांचे वडील हे सतत आजारी असल्याने त्यांचा औषधोपराचा खर्च हे दोन्ही मुलं करत असत. त्यामुळे घरातील एकाच कुटुंबातील दोन्ही भाऊ गेल्याने त्यांची परिस्थिती हलाखीची बनली आहे.

# अंगणवाडी मदतनीस पद भरती

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

सावंतवाडी तालुकाअंतर्गत अंगणवाडी केंद्रातील मानधनी अंगणवाडी मदतनीस पदांसाठी संबंधित ग्रामपंचायत महसूल गावातील इच्छुक व पात्र महिला उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. चौकुळ, कुंभवडे, नेने, केसरी, फणसवडे, केगद, कोलगाव, कुणकेरी गावडेवाडी, कुणकेरी लिंगाचीवाडी, कुणकेरी आयनगाळू, ओटवणे, माडखोल, रोणापाल, पाडलोस, मडुरा, तांबुळी, फुकेरी, नेतर्डे, डेगवे, सरमळे, धाकोरे, आरोंदा, नेमळे, कारिवडे, सांगेली, इन्सुली, मळेवाड, आदी सावंतवाडी तालुक्यातील अंगणवाडी केंद्रातील मदतनीस रिक्त पदांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज ३० जुलै ते १४ ऑगस्टपर्यंत बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, सावंतवाडी कार्यालय यांच्याकडे देण्यात यावेत. तसेच, अधिक माहितीसाठी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय व बाल विकास प्रकल्प अधिकारी, येथे संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कशेडी घाटात खचला रस्ता

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात भोगाव गावाजवळ रस्ता खचला आहे. त्या भागात खडी पसरून पुन्हा मलमपट्टी करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे महामार्गावरील तळकोकणात जाणारी व मुंबई दिशेने जाणारी दोन्ही बाजूची वाहतूक काही काळ खोळंबली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

याच दरम्यान खेड दिशेने जाणारा ट्रक खचलेल्या रस्त्यापासून पुढे पाच मीटर अंतरावर बंद पडल्याने वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला होता. शासन दरवर्षी या खचलेल्या रस्त्यावर लाखो रुपये खर्च करत असून तो पैसा फुकट जात आहे. या ठिकाणी खचलेल्या रस्त्याला लागलेले ग्रहण सुटता सुटत नाही. या ठिकाणी कायम स्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे बनले आहे. २००५ पासून येथील रस्त्याला ग्रहण लागले असून, दरवर्षी सातत्याने या ठिकाणी रस्ता खचण्याचे सातत्य कायम आहे. दरवर्षी शासनाकडून या रस्त्यावर लाखो रुपये खर्च करण्यात येतो; मात्र पावसाळ्यात मुख्यतः जुलै महिन्यात रस्ता खचण्याचे सातत्य कायम आहे.

या परिसरात अवजड वाहने चढत असताना अक्षरशः चढावरून पाठीमागे घसरून मोठा अपघातही घडू शकतो, अशी शक्यता आहे. याच ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता असून त्याकडे डोळेझाक केली जात असल्याचे प्रवासी जनतेतून बोलले जात आहे.

# गणेशोत्सव काळात मालगाड्यांची वाहतूक बंद

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोकण रेल्वे मार्गावरुन गणेशोत्सव काळात १५ दिवसांकरीता मालगाड्यांची वाहतूक बंद करण्यात यावी. या मालगाड्यांची वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात यावी. या मार्गावर गणेशोत्सवाकरीता अप डाऊन किमान १०० फेऱ्या सोडल्या जाव्यात, अशी मागणी उध्दव ठाकरे सेनेच्यावतीने करण्यात आली आहे.



दरवर्षी गणेशोत्सवाकरिता १ ते १८ सप्टेंबर दरम्यान कोकण रेल्वेने मध्य आणि पश्चिम रेल्वे मार्गे गणपती उत्सव विशेष गाड्या सोडल्या जातात. यंदाही गाड्या सोडल्या जाणार आहेत. कोकण रेल्वे मार्गावर उत्सव कालावधीत अजुन जादा गाड्या सोडता येत नाहीत. हे कारण रेल्वेकडून नेहमी सांगितले जाते. कारण ट्रॅक व्यस्त असल्याने आणि क्षमता संपल्याने आणखी अतिरिक्त गाड्या सोडता येत नाहीत. उत्सव काळात मालगाड्या पूर्णतः बंद करून त्यांची वाहतूक पर्यायी दुसऱ्या मार्गाने वळवण्याची

# न्हावेली शाळेसाठी वायफाय सुविधा

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

वेंगुर्ले येथील विशाल होडावडेकर यांनी जिल्हा परिषद न्हावेली शाळा क्रमांक १ मधील विद्यार्थी व शिक्षकांना डिजिटल साहित्याचा अध्ययन, अध्यापनात प्रभावी वापर करता यावा, यासाठी वायफाय सुविधा आणि एक वर्षापर्यंत रिचार्ज करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष प्रसाद शेगले यांच्या प्रयत्नातून हे साध्य झाले.

# सिंधुदुर्गमध्ये काजू उत्पादकांची दिशाभूल

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय करणारा शासन निर्णय तत्काळ रद्द करावा, ज्या शेतकऱ्यांनी काजू पीक विमा भरला आहे आणि ज्या शेतकऱ्यांच्या सात-बारावर काजू पिकाची नोंद आहे, अशा शेतकऱ्यांचे कृषी विभागाकडून मूल्यांकन करून शासनाने सरसकट १० ऐवजी ५० रु. प्रतिकिलो अनुदान द्यावे, या मागणीसाठी आज ठाकरे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.



आ. वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने, आंदोलन करण्यात आले. शासनविरोधी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. जिल्हाप्रमुख संजय पडते, सतीश सावंत, संदेश पारकर, नीलम पालव, अतुल रावराणे, कन्हैया पारकर, मंदार शिरसाट, सुशांत नाईक आदी सहभागी झाले होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या संख्येने काजू उत्पादक शेतकरी आहेत. या जिल्ह्यात पिकणाऱ्या काजूची गुणवत्ता सर्वोत्कृष्ट दर्जाचे आहे. या काजूला योग्य हमीभाव मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून वारंवार होत आहे. परंतु, ९ जुलैच्या शासन निर्णयाने प्रतिकिलो १० रु. अनुदान शासनाने जाहीर केले आहे व किमान ५० किलो व कमाल २ हजार किलो अशी मर्यादा घातली आहे. त्याचप्रमाणे विक्री केलेल्या काजूला व्यापाऱ्याकडून जीएसटी बिल घ्यावे, अशी अट आहे. या योजनेच्या लाभासाठी काजू उत्पादक शेतकऱ्यांनी काजू बी विक्री पावती, सात-बारा उतारा, आधार संलग्नित बचत बँक खात्याचा क्रमांकासह तपशील, कृषि विभागाच्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र तपशीलासह अर्ज राज्य काजू मंडळाकडे ३१ ऑगस्टपर्यंत सादर करावयाचा आहे.

# केसरकर भरीव कामांत अपयशी

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

मी आमदार आणि मंत्री म्हणून दहा वर्षांत जी कामे केली, ती गेली पंधरा वर्षे आमदार आणि मंत्री म्हणून दीपक केसरकर करू शकले नाहीत. विकासाच्या बाबतीत सावंतवाडी मतदारसंघात त्यांनी भरीव असे कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातील जनतेने परिवर्तन करावे, असे आवाहन माजी राज्यमंत्री प्रवीण भोसले यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.



पाच वर्षे राज्यमंत्री आणि अडीच वर्षे कॅबिनेट मंत्री असताना केसरकरांना मंत्री पदाची ताकद कळलेली नाही. त्यामुळे त्यांच्या मंत्रिपदाचा मतदारसंघासाठी आणि जिल्ह्यासाठी काय फायदा, असा प्रश्न करीत केसरकर यांना बदलल्याशिवाय या मतदारसंघाचा विकास होणार नाही, असे स्पष्ट केले. ते म्हणाले, शिक्षणमंत्री म्हणून जिल्ह्यातील बेरोजगारांना ते शिक्षक म्हणून नेमू शकले असते. परंतु, त्यांना कंत्राटीपदाचे गाजर दाखवण्यात आले. डीएड् धारकांवर हा अन्याय आहे. त्याला केसरकर जबाबदार आहेत. आता विधानसभेच्या तोंडावर गणेश मंडळांना पुन्हा बाजा, पेटी वाटण्याचे आमिष केसरकर दाखवत आहेत. मंडळांना पेटी देण्यास आमचा विरोध नाही. मात्र, निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ते करीत असलेले राजकारण योग्य नाही.

मल्टिस्पेशलिटी हॉस्पिटल, पंचायत समिती इमारत हे दोन वर्षांपूर्वीच मंजूर झाले होते. मात्र, जागेचा मुद्दा उपस्थित करून मुद्दाम त्यात खो घालण्याचे काम केसरकरांनी केले आहे. दरवाजात असलेल्या एसटी बसस्थानकाचीही तीच परिस्थिती आहे. त्यामुळे एवढी साधी कामे देखील करू न शकलेल्या केसरकारांना जनता आता थारा देणार नाही. केसरकर गाजावाजा करीत असलेले ताज व सिदादी हॉटेल हे दोन प्रकल्प शरद पवार यांनीच आणले होते. मात्र, श्रेयवादासाठी ते पूर्ण होऊ शकले नाहीत. आता सावंतवाडीत पंचतारांकित हॉटेल आणत आहे, असा गाजावाजा करून केसरकर जनतेची पुन्हा दिशाभूल करत आहेत.

# बीएसएनएल नेटवर्क कोलमडल

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी शहरात पाणी योजनेचे काम करताना बीएसएनएलची केबल तुटल्यामुळे गेले दोन दिवस लांजा तालुक्यात नेटवर्क पूर्णपणे कोलमडले आहे. त्यामुळे बीएसएनएल धारकांची गैरसोय झाली. या संदर्भात बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी रत्नागिरी येथे बीएसएनएलची केबल तुटल्याचे कारण पुढे केले. त्यामुळे बीएसएनएल नेटवर्क मिळत नाही. याबाबत तक्रारी आलेल्या आहेत. केबल जोडण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. लांजा तालुक्यात अनेक ग्राहक हे बीएसएनएल नेटवर्क वापरतात. ग्राहकांची संख्या मोठी आहे. गेले दोन दिवस बीएसएनएल ग्राहकांना नेट नसल्यामुळे मनस्ताप सहन करावा लागत आहेत. बीएसएनएल नेट असलेल्या काही शाळांमध्ये ऑनलाईन कामे प्रलंबित राहिली आहेत. ग्रामीण भागात ऑनलाइन कामे करणाऱ्यांना याचा फटका बसला आहे.

# काजू बीसाठी अनुदान

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

काजू उत्पादक शेतकऱ्यांना काजू बीसाठी शासनाकडून वित्तीय साह्य उपलब्ध करुन दिल्यास, काजू उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळेल. ही गोष्ट विचारात घेऊन २०२४ च्या काजू हंगामासाठी शासनाने काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी काजू बी अनुदान योजना सुरू केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य काजू मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, असे मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कदम यांनी दिली. यासाठी काजू उत्पादक शेतकऱ्याच्या सात-बारावर काजू लागवडीखालील क्षेत्र किंवा झाडांची नोंद असणे, शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षम काजुच्या झाडांची संख्या व त्यापासून प्राप्त काजू बी उत्पादन हे संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे, कृषि उत्पन्न बाजार समितीकडील नोंदणीकृत परवानाधारक काजू व्यापारी, नोंदणीकृत सहकारी संस्था, खरेदी-विक्री संघ व नोंदणीकृत काजू प्रक्रियादार यांना काजू बीची विक्री केलेली असणे तसेच काजू उत्पादक शेतकऱ्याने विक्री केलेल्या काजूच्या विक्री पावतीवर नोंदणीकृत खरेदीदाराचा जीएसटी क्रमांक देणे गरजेचे आहे.

## पदाधिकाऱ्यांची कार्यालयावर धडक

# सावंतवाडीला महावितरणचे ग्रहण

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

**वीज कंपनीचा कारभार तत्काळ सुधारा. लोकांना चांगली सेवा द्या, अन्यथा त्याच्या परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुराव धुरी यांनी सोमवारी महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आला होता. दरम्यान, जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. त्यामुळे आणखी तीन आठवडे वीज व्यवस्था सुरळीत होण्यासाठी लागणार असल्याचे महावितरणचे अधीक्षक अभियंता अशोक साळुंखे यांच्याकडून सांगण्यात आले होते.**




सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विजेची समस्या निर्माण झाली आहे. याबाबत जाब विचारण्यासाठी ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सावंतवाडी येथील महावितरणच्या अधीक्षक अभियंता साळुंखे यांच्या कार्यालयावर धडक दिली होती. स्थानिक आमदार दीपक केसरकर यांचे मतदारसंघाकडे लक्ष नसल्यामुळे मतदारसंघात मोठ्या प्रमाणात प्रश्न निर्माण झाले आहेत, असे त्यांनी सांगितले. तसचे, साळुंखे यांनी महावितरणची भूमिका मांडली.

यावेळी रुपेश राऊळ, चंद्रकांत गावडे, चंद्रकांत कासार, प्रकाश गडेकर, यशवंत परब, संजय गवस, भारती कासार, मायकल डिसूजा, उमेश नाईक, संदीप माळकर, आबा सावंत, अजित राऊळ, शब्बीर मणियार, सुनील गावडे, पुरुषोत्तम राऊळ, विनोद काजरेकर, रमाकांत राऊळ, प्रशांत बुगडे, रवींद्र काजरेकर, विलास परब, सचिन मुळीक, श्रुतिका दळवी, कल्पना शिंदे, विनिता घाड़ी, नयनी शेटकर आदी उपस्थित होते. तसेच, सुरक्षेच्या हेतूने महावितरण कार्यालयाच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

### वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रयत्न

महावितरणची संपूर्ण जिल्ह्यात एकूण ५३ सेक्शन ऑफिस आहेत. या सर्व ऑफिसमधील गावनिहाय आराखडा सुरू आहे. काही ठिकाणी भूमिगत वाहिन्या तर काही ठिकाणच्या विद्युत तारांना कव्हर टाकण्यात येणार आहे. आरडीसी स्कीममध्ये ७०८ कोटी रुपये मंजूर झाले असून, ही सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर सिंधुदुर्ग महावितरणची व्यवस्था चांगल्या प्रकारे होईल. तरी सुध्दा वीज व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी प्रयत्न करू.

# कोयना प्रकल्प होणार आधुनिक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

कोयना वीजनिर्मिती प्रकल्पाच्या आधुनिकीकरणाला सुरवात झाली आहे. पुढील २५ वर्ष हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती करेल. यासाठी या प्रकल्पात वीजनिर्मिती करणाऱ्या यंत्रांची कार्यक्षमता व गुणवत्तावाढीचे काम हाती घेण्यात आले आहे.

महाराष्ट्राची भाग्यरेषा म्हणून ओळख असलेल्या कोयना प्रकल्पातून मागणीच्या वेळी तत्काळ वीजपुरवठा केला जातो. १६ मे १९६२ पासून आतापर्यंत या प्रकल्पातून स्वच्छ, नितळ व प्रदूषणविरहित वीजनिर्मिती सुरू आहे. महाराष्ट्रात कोळशावर आधारित अनेक औष्णिक वीज प्रकल्प उभे राहिले. यातील काही प्रकल्प काळाची गरज लक्षात घेऊन अपडेट करण्यात आले नाहीत. त्यामुळे ते प्रकल्प बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मात्र, साठ वर्षाहून अधिक काळ अविरत वीजनिर्मिती करणाऱ्या कोयना प्रकल्पाच्या वीजनिर्मितीमध्ये भविष्यात कुठेही खंड पडू नये यासाठी महानिर्मिती कंपनीने या प्रकल्पाचे १८ संच टप्प्याटप्प्याने दुरुस्त करण्याचे ठरवले आहे.

### १८ संचांची टप्प्याटप्प्याने दुरूस्ती

वीजनिर्मिती करणारी अठरा मशिन नवीन घ्यायचे झाल्यास महानिर्मिती कंपनीला अंदाजे १८० कोटींचा खर्च आला असता. कमी खर्चात अधिक काळ वीजनिर्मिती करता यावी यासाठी गव्हर्निंग प्रणाली आणि पीएलसी प्रणाली दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

निवडक

## वनाधिकाऱ्यांचे वृक्षारोपण

**खांब :** बाहे गावात तालुक्यातील वनाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. येथील गावदेवी बाहे तरूण मंडळ व ग्रामस्थ मंडळ बाहे यांच्या संकल्पनेतून गावाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांच्या रोपांची लागवड करून वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख पाहुणे खांब वनपाल आर.एस.गायकवाड, एस.एन.शिद, ए.एस.भगत, एक.डी.लाटे,एम.बी.फडवले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**उरण :** श्रीराम मंदिर सभागृहामध्ये सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमाचे सामाजिक बांधिलकी जपत आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, गरीब व गरजूंना मोफत वह्यांचे वाटप, बालवाडीच्या विद्यार्थ्यांना गणवेश वाटप व ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप असे विविध उपक्रमाचा समावेश होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच उरणमध्ये निर्घृण हत्या झालेल्या यशश्री शिंदे हिला भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

## बारपे ग्रामस्थ करणार आंदोलन

**तळा :** एसटी महामंडळाच्या ढिसाळ कारभाराच्या निषेधार्थ बारपे गावातील नागरिकांनी एसटी सेवा वेळेवर सुरू न झाल्यास ठिय्या आंदोलन करण्याचे निवेदन माणगाव एसटी आगहर प्रमुखांना दिले आहे. वावेदिवाळी, वडाचीवाडी, मोऱ्याची वाडी, विनवली, साळशेत, बहुलेवाडी, महागाव, बारपे, महुरे, कोरखंडा या गावातील विद्यार्थी आणि नागरिकांना एसटीच्या अनियमित वेळेचा काही दिवसांपासून त्रास सहन करावा लागत आहे.

## मोफत आरोग्य शिबीर

**उरण :** उरण महिला सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्था उरण यांच्या माध्यमातून उरणमधील डाऊरनगर येथील आदिवासी वाडीत मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. सदरच्या शिबिरामध्ये तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली सर्दी, ताप, खोकला, डोकेदुखी, गुडगेदुखी, कंबरदुखी, अपचन, अनियमित पाळी, त्वचारोग, खाज येणे, शितपित्त, फंगल इन्फेक्शन, पिंपल्स, डोक्यात कोंडा इत्यादी रोगांवरील तपासणी करून त्यावरील औषध मोफत देण्यात आले.

## शैक्षणिक साहित्याचे वाटप

**नेरळ :** वाकस विभागात असणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिवस्वराज्य सामाजिक संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वाकस, मिरचोली, कोलीवली, चोरावले या जिल्हा परिषद शाळांचा समावेश आहे. याप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अक्षय जाधव, पदाधिकारी भरत शेळके, दीपक मोरे, तेजस जाधव, नरेश दुर्गे, निलेश तांबोळी, राजकुमार धुळे आदी उपस्थित होते.

# आरटीई प्रवेशात नवी अडचण

**वाढीव जागांच्या परवानगीचे कारण देत काही खासगी शाळांचा नकार**




**। रायगड । प्रतिनिधी ।**

**शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. मात्र, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाची वाढीव जागांना परवानगी घ्यावी लागेल, शाळेच्या पूर्वपरवानगीशिवाय आरटीई संकेतस्थळावर शाळेला परस्पर जोडून घेण्यात आले अशी कारणे देत काही खासगी शाळांकडून प्रवेश देण्यास नकार देण्यात येत आहेत. त्यामुळे आधीच विलंब झालेल्या आरटीई प्रवेशप्रक्रियेत पुन्हा नवी अडचण निर्माण होत आहे.**

वंचित घटक, सामाजिक आणि आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवर खासगी शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. यंदा शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशांच्या नियमांत बदल केल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. परिणामी न्यायालयात याचिका दाखल होऊन प्रवेशप्रक्रिया ठप्प झाली होती.

त्यामुळे पालक, विद्यार्थी आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेकडे डोळे लावून बसले होते. मात्र, शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशात केलेले बदल घटनाबाह्य असल्याचा निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच खासगी शाळांनी आधी दिलेले प्रवेश अबाधित ठेवून आरटीईअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार प्रवेशासाठी शिक्षण विभागाने काढलेल्या सोडतीनुसार प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची निवडयादी जाहीर करून प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंतची मुदत दिली होती.

यंदा राज्यातील ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार २४२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी दाखल झालेल्या २ लाख ४२ हजार ५१६ अर्जांतून ९३ हजार ९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. प्रतीक्षा यादीत ७१ हजार २७६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मंगळवारी सायंकाळपर्यंत ३० हजार ७७४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. प्रवेशासाठी बुधवार (दि.३१) शेवटचा दिवस आहे. प्रवेश मंदगतीने होत असल्याचे दिसून येत आहे.

> **उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत आहे. त्यामुळे खासगी शाळांनी आरटीईअंतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश देणे बंधनकारक आहे. वाढीव जागांना राज्य शासनाकडून मान्यता दिली जाणार आहे. तसेच सीबीएसईलाही त्याबाबत कळवण्यात येईल.**
> **– शरद गोसावी,** प्राथमिक शिक्षण संचालक

# अधिकारी करणार शाळांची तपासणी

- **१ ते ३१ ऑगस्ट पर्यंत अभियान कालावधी**
- **सुविधांबाबत प्रत्यक्ष पाहणी करणार**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे वजन कमी करण्याच्या उपाययोजनांची स्थिती, पाठ्यपुस्तकातील कोऱ्या पानांचा वापर, शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती कशी आहे, आनंददायी शनिवार उपक्रमाची अंमलबजावणी, शाळांची वेळ अशा विविध योजना, उपक्रमांची माहिती विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियानअंतर्गत घेतली जाणार आहे. शिक्षण विभागाकडून हे महाअभियान १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत राबवले जाणार असून, त्यासाठी शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना शाळांना भेट द्यावी लागणार आहे.

शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी या बाबतची माहिती दिली. विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियानाअंतर्गत राज्यातील पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना शिक्षण विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या सोयी सुविधांबाबत प्रत्यक्ष शाळात जाऊन तपासणी केली जाणार आहे. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत या संदर्भातील निर्णय घेण्यात आला.

अभियानातील पहिल्या वीस दिवसांत प्रत्यक्ष शाळा भेटी करणे, त्यानंतर सहा दिवसात आवश्यकतेनुसार सुधारणा किंवा उपाययोजना करणे, त्यानंतर चार दिवसांमध्ये अंमलबजावणी झाली किंवा नाही याची खात्री करणे, अशा पद्धतीने या अभियानाची कार्यदिशा निश्चित करण्यात आली आहे.अभियानाअंतर्गत शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व तत्सम पदावरील अधिकारी शाळांना भेट द्यावी लागणार आहे. सरल संकेतस्थळाद्वारे केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी, प्राचार्य, विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी प्रत्येक शाळा भेटीनंतर किंवा निरीक्षण केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल दररोज लॉगिनद्वारे अद्ययावत करायचा आहे. शिक्षण उपसंचालकांनी जास्तीत जास्त शाळा तपासण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांना उद्दिष्ट निश्चित करून द्यावे, माहिती अचूक संकलित करून विद्यार्थ्यांपर्यंत शाळांच्या विविध योजना योग्य प्रकारे पोहोचत आहेत का, याची खात्री करण्याबाबतचे निर्देश देण्यात आले आहेत.




## साळाव -मुरुड रस्त्यावरील प्रकार

# डांबरीकरणाची खडी रस्त्याबाहेर

**वाहनचालक व प्रवासी वर्गातून नाराजी**



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

साळाव -मुरुड -आगरदांडा रस्त्याचे डांबरीकरण होऊन काही महिने होतात न होतात तोच पहिल्या पावसाळ्यातच विहूर ते मजगांव गावठाण रस्त्यावर डांबरीकरण रस्त्याची खडी बाहेर आल्याने वाहन चालकांची डोकेदुखी ठरत असून नाराजी व्यक्त केली जात आहे.

काही महिन्यांपूर्वी साळाव-मुरुड -आगरदांडा रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले.मागील आठवड्यापासून पडत असलेल्या जोरदार पावसाने या रस्त्यावर विहूर- मोरे ते मजगांव गावठाण दरम्यान रस्त्यावर वळणावर डांबरीकरण रस्त्याची खडी बाहेर आल्याने वेळप्रसंगी अपघाताची भिती व्यक्त केली जात आहे.पहिल्या पावसाळ्यात रस्त्याच्या दुरावस्थेबाबत रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची चर्चा होत आहे.

साळाव -मुरुड -आगरदांडा रस्त्यावर याठिकाणी रस्त्यावर आलेल्या खडीमुळे वेळप्रसंगी दुचाकी घसरुन अपघाताची शक्यता लक्षात घेऊन बांधकाम विभागाने तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.



**● मुरुड गोपाळवट परिसरात डोंगरावरील पायऱ्या-पायऱ्यांच्या भातशेतीमध्ये लावणीचे काम सुरु असतानाचे मनमोहक चित्र.** (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## कर्जत ज्येष्ठ नागरिक संघातर्फे

# मैत्रीदिन कार्यक्रमाचे आयोजन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

आंतराष्ट्रीय मैत्री दिन या दिवशी अनेक संस्था विविध उपक्रम राबवतात. रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे मैत्री दिन साजरा करण्यात आला. त्यात वयोवृद्ध नागरिकांसाठी सहलीचे आयोजन करण्यात आले.

कर्जत शहरात ज्येष्ठ नागरिक संघाने सहल आयोजित केली. त्यात कर्जतपासून ४० किलोमीटर अंतरावरील आंबिवली येथील वनविहार लेणी येथे भेट देण्यात आला. या निसर्गरम्य ठिकाणी सहलीमध्ये ५७ ते ८३ वर्षे वयाचे ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले. शंभर एकर घनदाट जंगल असलेल्या परीसरात ज्येष्ठ नागरिकांनी वृक्षारोपण करून निसर्गाशी मैत्री साधली.या परिसरात असलेल्या लेण्यांना सर्वांनी भेट दिली. सहलीचा आनंद लुटताना कोणीही पावसाची पर्वा केली नाही.

# जखमी अजगर उपचारानंतर अधिवासात परतला

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील भानवज परिसरात वनखात्याचे नितीन कराडे, शितल साळुंखे आणि संतोषी बस्तेवाड हे कर्मचारी गस्त घालत असताना त्यांना दाट झुडपा जवळ पक्षांचा किलबिलाट होत असताना दिसला, त्या कारणे त्यांनी जवळ जाऊन पाहिले असता तेथे त्यांना अजगर जातीचा साप आढळला. त्याचे शरीरावर जखमा झाल्याने तो मरणासन्न अवस्थेत निपचित पडला होता, मात्र स्पष्ट आणि निरखून पाहिले असता त्याच्या शरीराची किंचितशी हालचाल होताना त्यांना दिसून आल्याने त्यांनी तातडीने ही बाब खालापूर तालुक्याचे वनअधिकारी राजेंद्र पवार आणि वनपाल भगवान दळवी यांना कळवली. त्यांच्या सल्ल्यानुसार त्या जखमी अजगराला सुरक्षितपणे सर्पमित्र नितेश उर्फ सोनू पवार यांच्या मदतीने खोपोलीतील वनखात्याच्या कार्यालयात आणले गेले. पशुवैद्य विष्णू काळे यांनी त्याची तपासणी केल्या नंतर त्याच्या जखमांवर औषध उपचार करून त्याला काही काळ देखरेखीखाली ठेवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार अजगराला सर्पमित्र दिनेश ओसवाल, अमोल ठकेकर, नवीन मोरे, अभिजीत घरत, सुकृत गोटस्कर, विजय भोसले यांच्या सहाय्याने गुरुनाथ साठेलकर यांच्या निवासस्थानी सुरक्षीत ठेवण्यात आले. अजगराची वेळेवर देखरेख करणे, त्याला औषधोपचार करणे, त्याचे शरीराची हालचाल करवून घेऊन मसाज करणे, त्याला ऊर्जा मिळावी म्हणून फोर्स फीडिंग अर्थात जबरदस्तीने खाणे भरवणे अशी सेवा करण्यात भक्ती साठेलकर, प्रवीण शेंद्रे व अन्य सर्पमित्रांनी वनअधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोणतेही कसूर ठेवली नाही त्यामुळेच या सर्व घटनाक्रमाचा शेवट अत्यंत गोड झाला.

## पदग्रहण सोहळा

**। पनवेल । वार्ताहर ।**

रिजन ३ चे रिजन चेअरमन सुयोग पेंडसे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात रिजन ३ मधील कामोठे, पनवेल रत्न, एन एम सेंटेनरी आणि वुमेन्स वॉरियर्स या ४ क्लबचा नवीन संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा नुकताच गोखले सभागृह, पनवेल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमात अरुणा सावंत , रीनाक्षी बौथियाल , संजय श्रीवास्तव आणि रेखा घरत यांनी आपल्या संचालकमंडळासोबत अध्यक्ष म्हणून पदग्रहण केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे प्रांतपाल एन. आर. परमेश्वरन उपस्थित होते त्यांनी नवीन संचालक मंडळाला आपल्या कामाच्या जबाबदाऱ्या सांगून पदग्रहण शपथ दिली.

# विद्युत वितरण कर्मचाऱ्यांचा सत्कार



**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेना पनवेल तालुक्याच्या वतीने कळंबोली शहर व पनवेल येथील विद्युत वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम, तालुकाप्रमुख व आयोजक विश्वास पेटकर, युवासेनेचे जिल्हाधिकारी पराग मोहिते, प्रमोद पाटील विभागप्रमुख, अरविंद कडव शहरसंघटक कळंबोली, कृष्णकांत कदम उपशहर प्रमुख, राजेश केणी विभागप्रमुख, महेश गुरव विभाग प्रमुख, कपिल जमदाडे विभाग प्रमुख, विवेक गडकरी शहर संघटक, तुषार निढालकर उपविभाग प्रमुख, जमील खान माथाडी ट्रांसपोर्टसेना अध्यक्ष, जीवन पाटील विधानसभा विभागचिटणीस युवासेना, गौरव गव्हाणे युवासेना अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- Tally अकाऊंट कामाचा अनुभव असलेली लेडीज हवी आहे. ८००७८३३२३२ झिराड, पगार १८०००/२१०००
- टॅली व GST चा अनुभव असलेली मुलगी हवी आहे. झिराडला बिल्डींग मटेरियल दुकानात. पगार रू. १५०००-२००००, मो. ९४२१९५४३४८
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३
- पोयनाड येथील ब्लॉक विकणेबाबत. पोयनाड येथील नवीन बिल्डींग हरी ॐ सोसायटी 1st फ्लोअर ब्लॉक, रोडटच ६३० एरिया रेडी पोझीशन विकणे आहे. संपर्क : ९४२२५३४३२०
- अलिबागमध्ये लेडीज पार्लर कामासाठी अनुभवी मुलगी पाहिजे. ८१४९८६५६२५
- घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी पंतनगर-अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७.३० ते ५.३०. संपर्क : ९८६७२१५४९५/९४२२३७५१२४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## लाभार्थ्यांना बसला सर्व्हर बिघाडाचा फटका

# धान्य वितरण व्यवस्था ठप्प

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्यातील शिधा वाटप केंद्रांवरील धान्य वितरण गेल्या दहा दिवसांपासून ठप्प आहे. वितरण प्रणालीतील सर्व्हरच्या बिघाडाचा फटका लाभार्थ्यांना बसला आहे. ऑफलाईन पध्दतीने धान्य वितरणाची सोय उपलब्ध नसल्याने, अंत्योदय आणि केशरी शिधापत्रिका धारकांना धान्य वितरण बंद झाले आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ अंगर्गत लक्ष्य निर्धारीत वितरण प्रणालीमार्फत ई पॉस मशिनव्दारे लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण करून लाभार्थ्यांना धान्य वितरण करण्याचे आदेश आहेत. त्यानुसार २०१७ पासून राज्यात सर्वच शिधा वाटप केंद्राना ई पॉस मशिन उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.या मशिन्सच्या साह्याने लाभार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने धान्य वितरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र सर्व्हरमधील बिघाडामुळे २० जुलै पासून सार्वजनिक वितरण प्रणाली आंतर्तूगत धान्य वितरण बंद पडले आहे.

त्यामुळे अनेक पिवळ्या आणि केशरी शिधा पत्रिका धारकांना जुलै महिन्याचे धान्य मिळू शकलेले नाही. शासनाने ऑफ लाईन पध्दतीने धान्य वितरणावर निर्बंध आणले आहेत, आणि ऑनलाईन वितरण बंद आहे. त्यामुळे अनेक गरजू कुटुंब हक्काच्या धान्यापासून वंचित राहिले आहेत. रायगड जिल्ह्यात ४ लाख ३० हजार शिधापत्रिका धारक आहेत. ज्यातून १७ लाख ७९ हजार लोकांना धान्य वितरण केले जाते. सर्व्हरमधील बिघाडामुळे ५० लाभार्थ्यांना जुलै महिन्याचे धान्य मिळू शकलेले नाही. राज्यातील सर्व विभागात धान्य वितरणाची जवळपास हीच स्थिती आहे.




> **आम्ही सर्व्हर ठीक होण्याची वाट पाहत आहोत. तांत्रिक बिघाडाबाबत वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा सुरू आहे. एक ते दोन दिवसात ही तांत्रिक अडचण दूर होईल अशी अपेक्षा आहे. ज्या लाभार्थ्यांना जुलै महिन्याचे धान्य मिळाले नाही. त्यांना ऑगस्ट महिन्यात दोन्ही महीन्याचे धान्य दिले जाईल.**
> **– सर्जेराव सोनवणे,** जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड

## 'महाडेश्वर' कोकण कार्यवाहपदी

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**



कुडली केंद्र शाळेचे केंद्रप्रमुख उमेश महाडेश्वर यांची महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा रायगडच्या कोकण विभाग कार्यवाहपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी सागर तुपे, राजेश सुर्वे, प्रकार चतरकर, संजय निजापकर, वैभव कांबळे तसेच शिक्षक वर्ग उपस्थित होता. महाडेश्वर यांच्या निवडीने शिक्षक वर्ग मित्रपरिवाराने अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी महाडेश्वर यांना शुभेच्छा दिल्या.

# शिवसेनेच्यावतीने रोजगार मेळावा

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघातील खालापूर तालुक्यात मोठी औद्योगिक वसाहत असली तरी या मतदारसंघातील तरुणांना रोजगारासाठी वणवण भटकावे लागत आहे, त्यातच अनेक तरुण-तरुणी बेरोजगारीचा सामना करीत असताना मतदारसंघातील तरुणांना रोजगार मिळावा या उद्देशाने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या माध्यमातून ३ ऑगस्ट रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन कर्जतमधील रॉयल गार्डन, मंगल कार्यालयात करण्यात आले आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उत्तर रायगडचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत यांच्या माध्यमातून ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० ते २ वाजेपर्यंतच्या वेळेत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात नामांकित ५० पेक्षा अधिक कंपन्यांचा सहभाग असणार असल्याने या रोजगार मेळाव्यात उपस्थित उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे. निवड झालेल्या सर्व उमेदवारांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे, त्याचबरोबर विविध नामांकित कंपन्यांमधून ऑन द जॉब ट्रेनिंगची रोजगार संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे भिसेगाव, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| एजाज सुलतानअली खान | ५४ | १/अ | १-१५-०० पो.ख<br>०-०७-५० एकुण<br>१-२२-५० | ०-६९ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ३१/०७/२०२४

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता.घर क्र.३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुझे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. कामतपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. मिनेश कृष्णा मुंढे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| ५८ | ५ | ०-२३-८० | ०-१९ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०१/०८/२०२४ **ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापनदिन

**। कोलाड । वार्ताहर ।**

स्नेहा ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ यांचा १४ वा वर्धापनदिन व वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. ३) सकाळी दहा वाजता जयश्री वसंत महाबळे आंबेवाडी नाका यांच्या निवासस्थानी रोहा तहसीलदार किशोर देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

दरवर्षी हा वर्धापनदिन सोहळा उत्साही वातावणात साजरा केला जातो. यावर्षीही या कार्यक्रमात ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा सभासदांचा सत्कार, विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झालेल्या हयात भाग्यवान जोडप्यांचा सत्कार, अहवाल व जमा-खर्च वाचन, प्रमुख पाहुण्यांचे मनोगत, अध्यक्षांचे भाषण तसेच इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, सर्व ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित राहावे, अशी विनंती मंडळाचे अध्यक्ष मारुती राऊत व सर्व पदाधिकारी यांनी केली आहे.

## आज उरण येथे शेकापचा कार्यकर्ता मेळावा

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा ७७ वा वर्धापन सोहळा २ ऑगस्ट रोजी मोठ्याा उत्साहात होणार असून, यानिमित्त पंढरपूर येथे शेकापचे दोन दिवस भव्य अधिवेशन भरविले जाणार आहे. तर १ ऑगस्ट रोजी उरण-जासई येथे वर्धापन दिनानिमित्ताने शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता मेळावा होणार आहे. कार्यकर्त्यांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन शेकापच्यावतीने करण्यात आले आहे.

## ‘लाडकी बहीण’चा साडेतीन हजारांचा टप्पा पूर्ण

**। सारळ । वार्ताहर ।**

येणारा श्रावण महिना आणि त्यात असलेला रक्षाबंधन हा सण याचे निमित्त साधत रायगड डाक विभागाने महिला व मुलींचा आर्थिक उत्कर्ष करणाऱ्या डाक विभागाच्या योजना घराघरापर्यंत नेण्याच्या मानस रायगड डाक विभागाचे अधीक्षक सुनील थळकर यांनी व्यक्त केला आहे.

आपल्या कर्मचारीवर्गाशी हितगुज करताना त्यांनी सामाजिक ऋण फेडण्याची संधी डाक विभागात काम करताना आपल्या सर्वांना सहजगत्या प्राप्त झाली आहे. त्यामुळे ग्राहकधार्जिणे होऊन लाडकी बहीण व लाडकी लेक या योजनेसाठी लागणारे आधार लिंक बचत खाते, महिला सन्मान बचत पत्र, सुकन्या समृद्धी योजना या योजनाचा प्रसार प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचवून खेडेगाव, शहरातील प्रत्येक बहिणीला खऱ्या अर्थाने रक्षाबंधनाचा आनंद देऊ या, असे आहवान डाक कर्मचारीवर्गाला केले.

महिलांना केवळ त्यांचे आधारकार्ड आणि त्यांचा मोबाइल नंबर असणे गजरजेचे आहे. २०० रुपये शुल्क भरल्यानंतर संबंधित महिलेचे खाते पोस्ट पेमेंट बँकेत उघडण्यात येते. पोस्ट पेमेंट बँक ही दुर्गम अशा ग्रामीण पातळीवरील घरापर्यंत उपलब्ध असल्याने महिला ग्राहकास अतिशय सोयीची आहे. रायगड डाक विभागात एप्रिलपासून सुरू झालेल्या चालू आर्थिक वर्षात सुकन्या समृद्धी योजनेची ११२४ व ११०५ महिला सन्मान योजनेची खाती व जूनपासून लाडकी बहीण या योजनेंतर्गत ३५०० बचत खाती उघडली गेली आहेत, अशी माहिती थळकर यांनी दिली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की आमचे अशिलांनी मौजे गुंजीस, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) श्रीमती संजीवनी ललित गोडबोले, २) श्री. अतुल ललित गोडबोले आणि ३) श्रीमती नंदिता ललित गोडबोले, यांच्या मालकीच्या भूमापन क्र. २४/१, २३/४ व २३/१ अशा मिळकती कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी त्या मिळकती निर्वेध असल्याची खात्री दिली असून, आमचे अशिलांनी निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची देखील मागणी केली आहे. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, निर्वेध मालकी हक्काचा दाखला दिला जाईल व आमचे अशिल सदर मिळकती या निर्वेध आहेत असे समजून विद्यमान मालकांबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख : ३१.०७.२०२४. सही/-
**(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मौजे वाडगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील श्रीमती संध्या रामदास घरत, (लग्नापूर्वीचे नाव श्रीमती शांताबाई मरबा भगत), यांच्या मालकीची भूमापन नं.१२६ पै., क्षेत्र ०-३४-४० हे. आर.) आकार ७.३७ (रू.पै.) ही मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विद्यमान मालकानी सदर मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकाबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग, सही/-
तारीख : - ३१.०७.२०२४. **(ॲड. सुरेंद्र नारायण जोशी)**
अे-१०१/१११, त्रिमूर्ती प्लाझा, बीचरोड,
अलिबाग, जिल्हा रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. शैलेश माधव चांगले, रा. रूम नं.६०३, एकदंत अपार्टमेंट, एस.के.रोड, दादर मुंबई ४०००२८ यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर | आकार रू=पैसे |
|---|---|---|---|
| १५४ | १/ब/२/ब | १-१९.०० | ०=८२ |

यापैकी लिहून घेणार यांस दिलेले क्षेत्र ०-१६.३५ हेक्टर.
तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा-कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी - हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/ हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे. तारीख:- ०१-०८-२०२४.

**श्री. विवेक अशोक धनवी,**
बी. कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट,
ऑफीस गाळा नं. ७ सुमनराज को. ऑप.
हौऊ. सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड,
मोबाईल नंबर - ९०११ ७३६००२.

### जाहीर नोटीस

**महसूल व वन विभाग**
**अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव यांचे कार्यालय कचेरी रोड, माणगांव, ता.माणगांव, जि. रायगड**

Email ID : altmangaon@gmail.com

**जाहीर नोटीस** **दावा क्रमांकः ८९/२०२४**

प्रति,

१.सारिका मचिंद्र दरेकर, रा. मारूती मंदिर जवळ, कातळी, ता. पोलादपुर, जि. रायगड. पिन कोड - ४०२३०३ २.सुनिता ज्ञानेश्वर पवार, रा. कुंभळवणे कपडे खुर्द, चांभारगनी, ता. पोलादपूर, जि. रायगड. पिन कोड-४०२३०३ ३. सविता वामन म्हामुणकर, रा. पाटणुस, ता. माणगाव. जि. रायगड. - ४०२३०८ १ ते ३ तर्फे अखत्यारी सुरज गजानन म्हामुणकर रा. पाटणुस, ता. माणगाव-रायगड- ४०२३०८ ४. प्रदिप अनंत म्हामुणकर ५. विजय अनंत म्हामुणकर ६. गिता गणेश दळवी ७. दामीनी प्रमोद म्हामुणकर ८. वैभवी प्रमोद म्हामुणकर ९. प्रतीक्षा प्रमोद म्हामुणकर ४ ते ९ तर्फे अख्यारी संदिप रघुनाथ गांधिले रा. रघुनाथ गांधीले घर क्र. ११९. बानेर भैरवनाथ मंदीरा जवळ पुणे शहर पुणे महाराष्ट्र - ४११०४५. **वादी**

**विरुध्द**

दगडू कोंडू भिलारे
रा. पाटणूस ता. माणगांव जि. रायगड. **प्रतिवादी**

ज्याअर्थी, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळ कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमुद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. आणि त्यासाठी जमिनीची खरेदी किंमत ठरवून मिळण्यासाठी न्यायधिकरणाकडे दावा अर्ज दाखल केलेला आहे. आणि ज्याअर्थी न्यायाधिकरणाने कुळकायद्याच्या तरतुदीनुसार जमिनीची किंमत निर्धारित करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी सदर दाव्याची सुनावणी दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे. तरी सदर तारखेस अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव, जि. रायगड येथे स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहुन बाजु मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचुन नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसुर करील, तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल. व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसुची**

| गावाचे नांव | स.न. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु. पैसे) | प्रकार |
|---|---|---|---|---|
| पाटणूस ता. माणगांव | ५६/३ | ०-१३-१० | ०.४० | भात |
| | ५६/२ | ०-०८-१० | ०.०६ | भात |

ठिकाण:- माणगांव सही/-
दिनांक:- २६/०७/२०२४ **(विकास भारूडकर)**
अपर तहसीलदार व
शेतजमीन न्यायाधिकरण, माणगांव

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | काळुंद्रे | १०९ (१२९) | ३९/२ | ०-२९-६ | १०२९ चौ.मी. पुर्णांकात १०५० चौ.मी. | **मौजे करंजाडे भुखंड क्र. ३५, सेक्टर-५A क्षेत्र-१०५० चौ.मी.** | मा. न्यायालयाचे आदेश क्र. RCS-९४/२००४ मधील न्यायालयाच्या निर्णयानुसार **प्रतिवादी क्र.२. श्रीमती भागाबाई शिवराम चिखलेकर (मयत) यांचे वारस**<br>२.१) श्री. वामन शिवराम चिखलेकर,<br>२.२) श्री. दिपक शिवराम चिखलेकर,<br>२.३) कु. दिपाली शांताराम चिखलेकर,<br>२.४) श्री. ऋषिकेश शांताराम चिखलेकर,<br>२.५) श्री. वृशाल शांताराम चिखलेकर,<br>२.६) श्रीमती. निर्मला शिवनाथ घरत<br>३. श्री. वामन शिवराम चिखलेकर<br>४. श्रीमती निर्मला विश्वनाथ घरत<br>५. श्री. शांताराम शिवराम चिखलेकर<br>६. श्री. दिपक शिवराम चिखलेकर<br>**७. कै. श्री. आत्माराम पदू चिखलेकर (मयत) यांचे वारस**<br>a. श्री. तुळशीराम आत्माराम चिखलेकर<br>b. श्री. लिलाधर आत्माराम चिखलेकर<br>c. श्रीमती शारदा केशव डाऊर<br>d. श्रीमती बारकी सखाराम घरत<br>८. श्री. मारुती पदू चिखलेकर | मा. न्यायालयाचे आदेश क्र. RCS-९४/२००४ मधील न्यायालयाच्या निर्णयानुसार वाटपाचे प्रस्तावित आहे. |
| २ | काळुंद्रे | १०९ (१२९)E | ५३/६ | ०-३०-० | | | | |
| ३ | काळुंद्रे | १०९ (१२९) | ६१/१ | ०-५५-० | | | | |
| ४ | काळुंद्रे | १०९ (१२८)D | ६१/५ | ०-३-० | | | | |
| ५ | ४४६ खारघर | ३४५ ओवे | ३४७/४<br>३४७/१<br>३८२/५ | ०-१२-५<br>०-०१-५<br>०-०१-५ | २७५० चौ.मी. पैकी १९०० चौ.मी. वाटप व शिल्लक ८५० चौ.मी. मंजूर पात्रता वाटपाकरिता प्रस्तावित आहे. | भूखंड क्रं.-२, से.-३४A, क्षेत्र- ८४९.८० चौ.मी., नोड-खारघर | मूळ भूधारक कै. महमद शरिफ शमसुद्दीन खानबंदे हे मयत असून त्यांचे मा. न्यायालय, पनवेल यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO. ८५७/१९९६ नुसार वारस म्हणून १. रईस अहमद शरिफ खानबंदे २. श्रीमती. बानुबी मह. शारीफ खानबंदे<br>कै. श्रीमती. बानुबी मह. शारीफ खानबंदे हे मयत असुन त्यांचे मा.न्यायालय, पनवेल यांच्याकडील CIVIL MISC. APPLN. NO. ३७३/२०१० नुसार वारस म्हणून श्री. रईस अहमद मोहम्मद शरिफ खानबंदे यांच्या नावे घोषित केलेले आहे.<br>याअनुषंगाने प्रस्तावित भूखंडाचे वाटप श्री.रईस अहमद मोहम्मद शरिफ खानबंदे यांच्या नावे भूखंड क्रं.-२, से.-३४A, क्षेत्र- ८४९.८० चौ.मी., नोड-खारघर या भूखंडाचे वाटप व करारनामा करण्याचे प्रस्तावित आहे. | विधी सहाय्यक यांनी दिलेल्या अभिप्रायान्वये, सद्यस्थितीत प्रस्तावित निवाडा व इरादित भूखंडाच्या वाटपाबाबत कोणताही प्रलंबित दावा, न्यायालयीन वाद, हरकत असल्याचे दिसून येत नाही. |
| ६ | | ४४६ ओवे | ३७०/२<br>३७१/०<br>३७२/० | ०-७२-६<br>०-३१-६<br>०-२४-३ | | | | |
| ७ | | १७८ ओवे | ३१७/०<br>३१९/५<br>३१६/२ | ०-५९-०<br>०-२२-२<br>०-१३-४ | | | | |
| ८ | | ३४५ ओवे | ३८२/२पै<br>३४७/२पै | ०-५९-०<br>०-१३-४ | | | | |
| | | | एकूण | ३-११-० | | | | |
| ९ | उलवे ५५८ | गव्हाण २२५ | २३७/६ | ०-१६-० | १५० चौ.मी. | **उलवे नोड येथील भुखंड क्र. ४२२, सेक्टर-१९ क्षेत्र-१४९.५ चौ.मी.** | **कै. मोतीराम जानाजी देशमुख (मयत) व कै. लिलाबाई मोतीराम देशमुख (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. महेश मोतीराम देशमुख<br>२) श्री. विलास मोतीराम देशमुख<br>३) श्री. नितीन मोतीराम देशमुख<br>४) श्री. निलेश मोतीराम देशमुख<br>५) श्री. मंगेश मोतीराम देशमुख | -- |
| **ता.उरण, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | पागोटे | २३५/८५ -८६ | ५९/५<br>९३/३<br>१२४/४<br>१३०/५<br>७३/१ | ०-१३-४<br>०-१७-०<br>०-०७-६<br>०-०५-८<br>०-१२-६ | **१७०० चौ.मी.** | **मौजे द्रोणागिरी येथील भुखंड क्र. १२६, सेक्टर-४८, क्षेत्र १६९९.५० चौ.मी.** | **कै. श्री. गजानन पांडुरंग पाटील यांचे वारस**<br>**१. श्री. रविंद्र गजानन पाटील**<br>**२. श्री. प्रविण गजानन पाटील**<br>**३. श्रीमती अचलता उर्फ वर्षा वामन ठाकूर**<br>**४. श्रीमती विजया गजानन ठाकूर**<br>**५. श्रीमती वैजयंती संजय पाटील** | निरंक |
| २ | नवघर | १००अ/८५ | ३२३/९<br>३२३/१०<br>३४७/१२<br>३४७/९<br>३४०/७<br>३३६/८<br>३२८/२ब | ०-२१-०<br>०-३०-२<br>०-१९-८<br>०-१०-९<br>०-११-६<br>०-१५-०<br>०-१२-० | | | | |
| ३ | नवघर | १००ब/८५ | ३२४/३ | ०-१७-० | | | | |
| ४ | करळ ३९/८७ | | ११९/७<br>१३५/४ | ०-०२-५<br>०-०४-५ | ६१.२५ चौ.मी. प्रत्येकी भुधारकास अल्पभुधारक म्हणून पूर्णांकात ४० चौ.मी. | भूखंड क्र.१४६, सेक्टर-५२, क्षेत्र-४० चौ.मी. | निवाड्यावरील सी सी प्रमाणे नावे श्री. रमेश कृष्णा कडू यांचे वारस सुमती रमेश कडू व इतर | निरंक |
| | **एकूण क्षेत्र** | | | **०-०७-०** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**तळ मजला, सिडको भवन,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/१३१/२०२४-२५**






# श्रीलंकेविरुद्ध 'सुर्य' तळपला

## रंगवला सुपर ओव्हरचा थरार

**। पल्लेकेल । वृत्तसंस्था ।**

सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने श्रीलंका दौऱ्यावर धमाकेदार कामगिरी केली आहे. भारतीय संघाने ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेत यजमान श्रीलंकेला क्लीन स्वीप करून इतिहास रचला. पल्लेकेले येथे मंगळवारी (दि.३०) खेळला गेलेला शेवटचा सामना अतिशय रोमांचक होता. या सामन्यात बरोबरी झाली, त्यानंतर भारतीय संघाने सुपर आव्हरमध्ये विजय मिळवला.

भारतीय संघाने मालिकेतील पहिला सामना ४३ धावांनी जिंकला होता. यानंतर दुसरा सामना ७ गडी राखत मालिकेवर कब्जा केला होता. आता तिसरा सामनाही जिंकून भारतीय संघाने क्लीन स्वीप केला आहे. तिसऱ्या सामन्याच्या सुपर ओव्हरमध्ये भारतीय संघाला ३ धावांचे लक्ष्य मिळाले होते. सूर्याने महिष तिक्षीनाच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारून सामना जिंकला.

या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना १३७ धावांचे लक्ष्य श्रीलंकेसमोर ठेवले होते. यावेळी भारतीय संघाने केलेले बरेच प्रयोग चुकीचे ठरले. संजू सॅमसनला नंबर ३ आणि रिंकू सिंगला नंबर ४ वर पाठवण्यात आले, जे अपयशी ठरले. संजू शून्यावर तर रिंकू १ धावेवर बाद झाला. भारतीय संघाने केवळ ४८ धावांत ५ गडी गमावले होते. यानंतर शुबमन गिल आणि रियान पराग यांनी ४० चेंडूत ५४ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सांभाळला. गिल ३९ आणि पराग २६ धावा करून बाद झाले. शेवटी वॉशिंग्टन सुंदरने २५ धावा केल्या. याशिवाय एकही फलंदाज मैदानात टिकू शकला नाही. भारतीय संघाने ९ बाद १३७ धावा केल्या. श्रीलंकेकडून महिष तिक्षानानं ३ तर वानिंद हसरंगानं २ बळी घेतले. रमेश मेंडिस, चामिंडू विक्रम सिंघे आणि असिथा फर्नांडो यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

प्रत्युत्तरात, श्रीलंकेच्या संघानेही ८ गडी गमावून १३७ धावा केल्या आणि सामना बरोबरीत सोडवला. कुसल परेराने ४६ आणि कुसल मेंडिसने ४३ धावांची खेळी केली. तर, पथुम निसांकाने २६ धावा केल्या. रिंकू सिंगने भारतासाठी १९ वे षटक टाकले, ज्यात त्याने २ बळी घेतले. त्यानंतर शेवटच्या षटकात श्रीलंकेला ६ धावांची गरज असताना सूर्या स्वतः गोलंदाजीसाठी आला. त्याने २ बळी घेत या षटकात केवळ ५ धावा दिल्या आणि सामना बरोबरीत आणला.





**सुर्यकुमार यादव** **२० वे षटक**
**0 | W | W | 1 | 2 | 2**

**सुपर ओव्हर**
**श्रीलंका : Wd 1WW (2-2)**
**भारत : 4 (4-0)**

# ऑलिम्पिक नगरीत अन्नासाठी धावाधाव




- **मुलभूत सुविधांचा अभाव**
- **ग्रेट ब्रिटनच्या खेळाडूंच्या काही रात्र जेवणाविना**

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिक स्पर्धेला सुरुवात झाल्यापासून आयोजन समितीला परदेशी खेळाडू व संघातील सदस्यांकडून क्रीडा नगरीत आणि केंद्रांवर मूलभूत सुविधांच्या अभावामुळे तीव्र टीकेला सामोरे जावे लागत आहे. ग्रेट ब्रिटन पथकाच्या प्रमुखाने पहिल्या दिवसापासून योग्य अन्नाच्या अभावाचा मुद्दा उपस्थित केला. ग्रेट ब्रिटनच्या कितीतरी खेळाडूंना रात्रीच्या जेवणाविना राहावे लागले. त्यामुळे स्पर्धेच्या बाकी कालावधीसाठी त्यांच्या प्रथक प्रमुखाला खेळाडूंच्या स्वयंपाक गरजा पूर्ण करण्यासाठी तातडीने मायदेशातून स्वयंपाकी पाचारण करणे भाग पडले. एका क्रीडापटूने सांगितले की, जेव्हा खेळाडू त्यांच्या क्रीडा प्रकारात सहभागी होऊन क्रीडा नगरीत आले, तेव्हा त्यांच्यासाठी अन्न उपलब्ध नव्हते. जेव्हा आम्ही यासंदर्भात आयोजन समिती अधिकारी किंवा स्वयंसेवक यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांच्यापाशी उत्तर नव्हते. आयोजन समितीने या मूलभूत बाबींकडे तातडीने लक्ष पुरविणे आवश्यक आहे, असे या खेळाडूने सांगितले. आणखी एक खेळाडू म्हणाला की, आम्हाला आमच्या गरजा विशद करणे कठीण ठरत आहे. एका स्टार आंतरराष्ट्रीय खेळाडूलाही ज्याचे मी नाव उघड करणार नाही, त्यालाही जेवण मिळाले नाही. आमच्यासाठी हे धक्कादायक आहे.

पॅरिस ऑलिम्पिक 2024

**'आयफेल' टॉवरवरून...**



विनायक दळवी

# लोव्हलिना पदकापासून एक फेरी दूर




लोव्हलिना बोरगोहेन आसामच्या गोलघाट विभागातून आलेली. टोकिओ ऑलिम्पिकपर्यंत कुणाच्या सिजगणतीतही नव्हती. पोटाची खळगी भरण्यासाठी बोरगोहेन कुटुंबियांना फारच कष्ट करावे लागत होते. लिमा आणि लिया या तिच्या बहिणी. दोघीही मणिपूरी स्टाईलचे 'मुईभाई' बॉक्सिंग खेळायच्या, पण पैशासाठी. प्रदर्शनीय लढतीत सहभागी व्हायला लोव्हलिनाही त्याच मार्गाने चालली होती. घर चालविण्यासाठी तिला पडेल ते काम करावे लागत होते. त्यावेळी गावात स्पोर्टस् ऑथरिटी ऑफ इंडियाच्या क्रीडा गुणवत्ता शोधण्याचे पथक आले होते. त्यावेळचे प्रसिद्ध प्रशिक्षक पद्म बोडो यांनी लोव्हलिनाला पाहिले. तिच्यातली गुणवत्ता त्यांनी पाहिली. अखेर त्यांनी तिला गौहाती येथे येण्यास सांगितले. भारतीय बॉक्सिंग मधला एक नवा अध्याय सुरू झाला.

पॅरिस ऑलिम्पिकच्या बॉक्सिंग स्टेडियमवर आज भारताच्या टोकियो ऑलिम्पिकपदक विजेत्या लोव्हलिनाचा सामना होता, ७५ किलो गटाच्या ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन नॉर्वेच्या सुनिवा हॉफस्टेड हिच्याशी. लोव्हलिना तिच्याशी प्रथमच खेळत होती. दोघांनाही एकमेकांचा खेळ ठाऊक नव्हता. त्यामुळे लढत तुल्यबळ होणार होती.

लोव्हलिना खरंतर बॅकफूटवर खेळणारी. यावेळी मात्र तिने अचानक आपला पवित्रा बदलला आणि हॉफस्टेडला आश्चर्यचकित केले. ती पुढे येऊन फटके मारायला लागली. त्यामुळे गोंधळलेल्या हॉफस्टेडचा अंदाज चुकला. तिला अचानक बचावावर भर द्यावा लागला. ५-० अशी गुणांवर लोव्हलिना जिंकली. प्रत्यक्षदर्शनी लढत एकतर्फी झाली असे दिसत असले तरी लोव्हलिनाला हे गुण मिळविताना अनुभवाने कमी असणारी स्पर्धक आज प्रतिस्पर्धी म्हणून समोर आली होती. यानंतरच्या पदकाच्या फेरीत चीन लिक्यू या जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या स्पर्धकाशी दोन हात करायचे आहेत. लोव्हलिनाला अशी आव्हाने स्वीकारायला आवडतात.

आज बॉक्सिंग स्टेडियमवर अनेक भारतीय चाहत्यांनी गर्दी केली होती. लोव्हलिनाला सतत ओरडून सर्वजण प्रोत्साहन देत होते. लोव्हलिनाही खेळताना प्रचंड पाठबळ मिळत होते. त्यामुळे सामन्याआधी तुल्यबळ लढत होईल असे वाटत असताना एकतर्फी झाली. प्रतिस्पर्धी उंचीपुती असूनही लोव्हलिनाने तिचे फटके सहज चुकविले होते. तिचे चेहऱ्यावर दिशेने येणारे पंचेस, जॅन्डा ती सहजरित्या अडवित होती. मात्र, समोरच्या प्रतिस्पर्ध्याने आक्रमणाला सुरूवात करताच क्षणी ती बचावावर येत होती. ऐन मोका मिळताच तिने चेहऱ्यावर मारण्याच्या संधी अनेकदा साधली. त्यामुळे लोव्हलिनाला अखेर एकतर्फीच विजय मिळाला.

# लक्ष्य सेनचा अविश्वसनीय खेळ

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

बॅडमिंटन कोर्टवर लक्ष्य सेनचा अविश्वसनीय खेळ पाहायला मिळाला. बिगरमानांकित लक्ष्यने त्याच्यासमोर येणाऱ्या प्रत्येक तगड्या प्रतिस्पर्धीला तो सहज चितपट करत आहे. पण, बुधवारी त्याने तिसऱ्या मानांकित आणि जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या जॉनथन ख्रिस्टी याला पराभवाचा धक्का दिला.

पहिल्या सेटमध्ये २-८ अशा पिछाडीवर असलेला लक्ष्य न खचता मोठ्या धैर्याने प्रतिस्पर्धीचा मुकाबला करताना दिसला. अविश्वसनीय बचाव अन् तितकाच कौशल्यपूर्ण आक्रमणाच्या जोरावर लक्ष्यने जॉनथनला सैरभैर केले. पहिला सेट २१-१८ असा जिंकून त्याने सामन्यावर पकड घेतली. पण, तरीही तो निर्धास्त झाला नाही, त्याचे ध्येय हे विजय मिळवणे हेच होते आणि त्यासाठी त्याने इंडोनेशियाच्या खेळाडूला संघर्ष करण्यास भाग पाडले.

लक्ष्यने मारलेला बॅकहँड परतीचा फटका सध्या चर्चेचा विषय ठरताना दिसत आहे. हा फटका त्याच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारा ठरला.

त्याने दुसऱ्या सेटमध्ये २१-१२ अशी बाजी मारताना उप उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आणि त्याच्यासमोर भारताच्या एचएस प्रणॉयचे आव्हान असण्याची दाट शक्यता आहे.





**महाराष्ट्राच्या नेमबाजाचा मोठा कारनामा**

# अंतिम फेरीत मिळवले स्थान

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारा महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसळेने बुधवारी (दि.३१) मोठा कारनामा केला आहे. त्याने पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन प्रकारात अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. त्यामुळे आता त्याने भारतीयांच्या पदकांच्या आशाही उंचावल्या आहेत.

बुधवारी झालेल्या पात्रता फेरीत स्वप्नील ५९० गुणांसह ७ व्या क्रमांकावर राहिला. या फेरीत पहिल्या ८ नेमबाजांना अंतिम फेरीत पदकासाठी खेळण्याची संधी मिळते. त्यामुळे आता स्वप्नीलही १ ऑगस्ट रोजी पदक मिळवण्यासाठी अंतिम फेरीत निशाणा साधताना दिसेल. पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३ पोझिशन प्रकाराची अंतिम फेरी १ ऑगस्टला दुपारी १ वाजता सुरू होणार आहे.

## पराभवांमुळे निवृत्तीची घोषणा

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत मंगळवारी (दि.३०) बॅडमिंटनमध्ये भारतीय महिला दुहेरी संघात खेळणाऱ्या अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो यांना सलग तिसऱ्यांदा पराभवाचा सामना करावा लागला. याचबरोबर पॅरिस ऑलिम्पिकमधील प्रवास संपल्यानंतर भारतीय बॅडमिंटनपटू अश्विनी पोनप्पा हिने निवृत्ती जाहीर केली. अश्विनी आणि तनिषाला 'क' गटातील अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या सेटियाना मापासा आणि अँजेला यू यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.



# भारताची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ स्पर्धेत भारताच्या हॉकी संघाने आत्तापर्यंत दमदार कामगिरी केली आहे. कर्णधार हरमनप्रीत सिंग शानदार फॉर्ममध्ये आहे. यातच आता बुधवारी (दि.३१) आंनदाची बातमी मिळाली आहे. भारताच्या हॉकी संघाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. मंगळवारी (दि.३०) भारताने आयर्लंडला २-० अशा गोलफरकाने पराभूत केले होते. त्यानंतर रात्री ऑस्ट्रेलियाला बेल्जियमने ६-२ अशा गोलफरकाने पराभूत केले. त्यामुळे भारत आणि बेल्जियम या दोन संघांनी 'ब' गटातून उपांत्यपूर्व फेरीतील प्रवेश निश्चित केला आहे.

या आधी 'ब' गटात भारताने न्यूझीलंडला ३-२ अशा फरकाने पराभूत केले होते. त्यानंतर अर्जेंटिनाविरुद्धच्या सामन्यात भारताने १-१ अशी बरोबरी साधली. यानंतर भारताने आर्यलंडला पराभूत केले. त्यामुळे सध्या भारतीय संघाचे ७ गुण आहेत. यासह भारत 'ब' गटात दुसऱ्या क्रमांकावर आहेत. बेल्जियम तीन विजयांसह ९ गुण मिळवत अव्वल क्रमांकावर आहे. आता भारताचे बेल्जियम आणि ऑस्ट्रेलिया या संघांविरूद्धचे साखळी फेरीतील सामने बाकी आहेत.दरम्यान, भारताने उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले असल्याने आता ते पदकापासून अजून २ पावले दूर आहेत.




## ऑलिम्पिक म्युझियम

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

पॅरिस शहरात ऑलिंपिकचा माहौल सतत जाणवत राहावा आणि सगळ्यांना सतत काही ना काही मिळावे याची खबरदारी प्रशासनाने घेतली आहे. याचाच एक भाग म्हणून पॅरिसमध्ये ऑलिंपिकसाठी वेगवेगळ्या विषयांवर म्युझियम्स सुरू केले आहेत. ऑलिंपिकचा इतिहास आणि भविष्य दाखवणारे हे म्युझियम स्थानिक क्रीडाप्रेमी आणि पर्यटकांच्या आक्रषणाचे केंद्र ठरत आहे. लक्झनबर्ग गार्डनमध्ये पहिले आर्ट्स म्युझियम अशी ओळख असलेल्या 'लक्झनबर्ग म्युझियम'मध्ये हे तात्पुरते संग्रहालय तयार करण्यात आले आहे.



**गर्भवती असूनही स्पर्धेत खेळली**

# नादा हफिझच्या जिद्दीला सलाम

**। पॅरिस । वृत्तसंस्था।**

ऑलिंपिकसाठी पात्र ठरून आपली गुणवत्ता सादर करण्याकरिता वयाचे बंधन नाही; पण पॅरिस ऑलिंपिक त्याही पलीकडे गेले आहे. इजिप्तची नादा हफिझ ही सात महिन्यांची गर्भवती असून ती सोमवारी (दि.२९) झालेल्या महिला तलवारबाजी स्पर्धेत खेळली.

२६ वर्षीय नादा हफिझ ही वैयक्तिक सब्रे गटात सहभागी झाली होती. परंतु, तिला पराभव पत्करावा लागला.

हफिझ ही इजिप्तची राजधानी कैरोतील रहिवासी आहे आणि हे तिचे तिसरे ऑलिंपिक आहे. माझ्यासाठी कोणत्याही परिस्थितीत ऑलिंपिकमध्ये खेळणे हे प्रतिष्ठेचे आहे, अशी भावना हफिझने यावेळी व्यक्त केली. हफिझने पहिल्या फेरीत अमेरिकेच्या एलिझाबेथ तार्ताकोवस्की हिचा १५-१३ असा पराभव शानदार सुरुवात केली होती. परंतु, पुढच्या फेरीत तिला दक्षिण कोरियाच्या जिऑन ह्याँगकडून पराभव स्वीकारावा लागला.




**'सोमवारी मी व्यासपीठावर आले तेव्हा आम्ही तिघे तेथे होतो. मी, माझी प्रतिस्पर्धी आणि अजून या विश्वास येण्याच्या प्रतीक्षेत असलेले माझे मूल...' अशी माहिती स्वतः हफिझने सोशल मीडियावरून प्रसिद्ध केली होती.**

या दोन सामन्यांत माझ्यासह माझ्या मुलाचाही शारीरिक आणि मानसिकतेचा तेवढाच वाटा आहे,'' असे हफिझ म्हणते. गर्भवती राहणे सोपे नाही. वेगवेगळ्या परिस्थितींचा सामना करावा लागतो, तसेच, हे जीवन आणि खेळ यांच्यातील समतोलपणा साधण्यासाठीही कसरत करावी लागते; पण खेळासाठी हे सर्व सहन करण्यासारखे आहे, असे सांगणाऱ्या हफिझने पती इब्राहिम आणि संपूर्ण कुटुंबाचे आभार मानले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)